cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–८३ | बुधवार दि.३ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

**संपादकीय**

## धोक्याचे पर्यटन टाळलेलेच बरे

प्रत्येक वर्षी जून, जुलै, ऑगस्ट महिन्यातील सुटीच्या दिवसांमध्ये अलीकडच्या काळात घडणाऱ्या दुर्घटनेमुळे आता पर्यटनासाठी बाहेर पडणाऱ्यांना आनंददायी प्रवासाच्या शुभेच्छा पेक्षाही कोठे जपून जावे याची माहिती देण्याची वेळ आलेली दिसते. रविवारी एकाच कुटुंबातील पाच सदस्य वाहून गेल्याच्या दुर्घटनेने पावसाळ्याच्या प्रारंभीच निसर्गाने इशारा दिलेला आहे असे मानायला हरकत नसावी. या बुडालेल्यांमध्ये ४ ते १३ वर्षे वयोगटातील तीन मुली, मुलगा आणि महिलेचा समावेश आहे.

## केजरीवाल यांच्या याचिकेवर हायकोर्टाची सीबीआयला नोटीस

नवी दिल्लीः सीबीआयने केलेल्या अटकेला दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी आव्हान देणाऱ्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) ला नोटीस बजावली आहे. केजरीवालांच्या याचिकेवर मंगळवारी (दि.२ जुलै) दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली. केजरीवालांच्या सीबीआय अटकेच्या आव्हान याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयाने ७ दिवसांत उत्तर दाखल करण्यास सांगितले आहेत. त्यानंतर दोन दिवसांत उत्तर द्यावे लागेल. न्यायमूर्ती नीना बन्सल कृष्णा यांनी सीबीआयला हे निर्देश दिले आहेत. न्यायालयाने हे प्रकरण बुधवार १७ जुलै रोजी सूचीबद्ध केल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

# राज्यात पीएम किसानचे २० लाख लाभार्थी वाढले

## कृषी मंत्री धनंजय मुंडे यांची अधिवेशनात लक्षवेधीवर माहिती



**मुंबई । प्रतिनिधी**

**केंद्र सरकारच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेल्या पीएम किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपये तर यावर्षीपासून राज्य शासनाने सुरू केलेल्या नमो शेतकरी महासन्मान योजनेतून ६ हजार रुपये असे एकूण १२ हजार रुपये शेतकऱ्यांना दिले जातात. या योजनेत चौदाव्या हप्त्यापर्यंत ७० लाख लाभार्थी राज्यातून लाभ घेत होते. कृषी विभागाने विविध मोहिमा राबवत गेल्या एक वर्षामध्ये या योजनेमध्ये २० लाख ५० हजार लाभार्थ्यांची वाढ करण्यात आली असल्याची माहिती आज एका लक्षवेधीच्या उत्तरादरम्यान कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.**

पी एम किसान योजनेत राज्यातील ६५ हजार शेतकरी काही कागदपत्रांच्या किंवा ई केवायसीच्या कारणावरून वंचित राहिल्या संदर्भात आमदार अभिमन्यू पवार यांसह विविध सदस्यांनी लक्षवेधी उपस्थित केली होती. या लक्षवेधीला कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी उत्तर देत संबंधित ६५ हजार शेतकऱ्यांचा परिपूर्ण प्रस्ताव केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी सादर केलेला असून या प्रस्तावास शक्य तितक्या लवकर मान्यता मिळवून देण्यासाठी आपण स्वतः पाठपुरावा करणार असल्याचेही धनंजय मुंडे यांनी विधानसभेत सांगितले. दरम्यान या योजनेमध्ये आणखी पात्र असलेल्या लाभार्थ्यांची वाढ व्हावी याबाबत राज्यस्तरावरून तसेच केंद्र स्तरावरून विविध मोहिमा वेळोवेळी राबविण्यात येतील, असेही धनंजय मुंडे यांनी सांगितले. तसेच डेटा एन्ट्री करणाऱ्या व्यक्तींसाठी स्वतंत्र लॅपटॉप देणार असल्याचीही घोषणा धनंजय मुंडे यांनी यावेळी विधानसभेत बोलताना केली. आ.अभिमन्यू पवार यांसह आ.प्रकाश आबिटकर, आ. बच्चू कडू, आ.श्वेताताई महाले यांसह आदी सदस्यांनी आपले प्रश्न उपस्थित केले.

# आज परळी बंद!

## बापू आंधळे हत्या प्रकरणात आ.रोहित पवारांच्या असंवेदनशील वक्तव्याचा निषेध

### तरुण सरपंचाची निर्घृण हत्या झाली, रोहित पवारांचे मात्र चामडी बचाव आणि राजकीय पोळी भाजण्याचे धोरण

**परळी । प्रतिनिधी**

२९ जून रोजी धनंजय मुंडे समर्थक व मरळवाडीचे सरपंच असलेले बापूराव आंधळे यांची डोक्यात गोळ्या झाडून निर्घृण हत्या करण्यात आली. तसेच आणखी एक तरुण गोळीबारात जखमी असून मृत्यूशी झुंज देत आहे. या प्रकरणात पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंद केला असून ते तपास करत आहेत. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांना स्वतःची व आपल्या पक्षाची कातडी वाचवायची इतकी घाई झाली आहे की, ते मयत बापू आंधळे व त्याच्या कुटुंबविषयी सहनुभीती दाखवायचे सोडाच,



उलट या निर्घृण हत्येतील आरोपीची पाठराखण करत असून, धनंजय मुंडे यांची व परळीची बदनामी करत सुटले आहेत. त्यांचे हे वर्तन अत्यंत असंवेदनशील व निषेधार्ह असून, याविरूद्ध बुधवार दि. ०३ जुलै रोजी परळी शहर बंदची हाक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने देण्यात आली आहे.

एका तरुणाची निर्घृण हत्या झाली, आणखी एक जण मृत्यूशी झुंज देत आहे. त्याबद्दल कोणतीही संवेदनशीलता न दाखवता केवळ राजकारण मध्ये आणून

◀◀ पान २ वर

# विधानपरिषदेसाठी पंकजाताई मुंडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

### मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्र्यांसह मंत्री, आमदारांनी दिल्या शुभेच्छा

### पंकजाताई आगे बढो, मुंडे साहेब अमर रहेच्या घोषणांनी विधानभवन परिसर दणाणला



> **“ मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्र्यांसह मंत्री, आमदारांनी दिल्या शुभेच्छा**
>
> उमेदवारी दाखल केल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, धनंजय मुंडे अतुल सावे, गोपाळराव पाटील आदी मंत्री तसेच आमदार व महायुतीच्या नेत्यांनी पंकजाताईंना शुभेच्छा दिल्या. यावेळी राज्यभरातून समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पंकजाताई आगे बढो, हम तुम्हारे साथ है, लोकनेते मुंडे साहेब अमर रहे च्या घोषणांनी विधानभवन परिसर दणाणून गेला होता.

**मुंबई । प्रतिनिधी**

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी मंगळवारी विधानपरिषद निवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील अनेक मंत्री तसेच आमदारांनी त्यांना यावेळी शुभेच्छा दिल्या. पंकजाताईंची उमेदवारी दाखल करतेवेळी विधानभवन परिसरात तसेच वरळीच्या कार्यालयात राज्यभरातून आलेल्या

◀◀ पान २ वर

## नीट परिक्षाप्रश्नी संसदेत चर्चा व्हावी; राहुल गांधी यांचे मोदींना पत्र





**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**संसदेचे पावसाळी अधिवेशन सध्या सुरू आहे. संसद अधिवेशनात नीट पेपफुटीवरून संसदेत पहिल्याच दिवशी प्रचंड गदारोळ झाला. त्यानंतर देखील विरोधक आपल्या मागणीवर ठाम आहेत. दरम्यान, लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी नीट परिक्षाप्रश्नी संसदेत चर्चा व्हावी अशी मागणी करणारे पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहले आहे.**

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पत्रात म्हटले आहे की, ‘‘प्रिय पंतप्रधान,मी बुधवार दि.३ जुलै रोजी नीट वर संसदेत चर्चेची विनंती करण्यासाठी हे पत्र लिहित आहे. आमचे उद्दिष्ट २४ लाख उमेदवारांच्या हितासाठी त्यांच्या उत्तरेस पात्र ठरणे आहे. मला विश्वास आहे की, तुम्ही या चर्चेचे नेतृत्व करत असाल तर ते योग्य ठरेल‘‘ लाखो कुटुंबांनी आपल्या मुलांना आधार देण्यासाठी प्रचंड वैयक्तिक त्याग केला आहे. अनेकांसाठी पेपर फुटणे म्हणजे आयुष्यभराच्या स्वप्नाचा विश्वासघात आहे. हे विद्यार्थी आणि त्यांचे कुटुंबीय आमच्याकडे, त्यांच्या लोकप्रतिनिधींकडे या समस्येचे निराकरण करण्यासाठी धाडसी आणि निर्णायक पावले उचलण्याची अपेक्षा करत आहेत. गेल्या सात वर्षांत ७० हून अधिक पेपर फुटले आहेत, ज्याचा

◀◀ पान २ वर

# चवदार तळ्याचे लवकरच शुद्धीकरणासह सौंदर्यीकरण

## उदय सामंत यांचे आश्वासन, ७२ कोटींची तरतूद करणार; विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, नितीन राऊत यांनी केला प्रश्न उपस्थित



**मुंबई । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील महाड शहरातील चवदार तळ्यातील पाणी शुद्धीकरणासाठी अमृतसर येथील सुवर्ण मंदिराच्या धर्तीवर योजना राबविण्यात येईल. या योजनेसाठी ६५ कोटी रुपयांचा आणि चवदार तळे परिसर सौंदर्यीकरणाच्या कामासाठी ७ कोटी रुपयांचा असा एकूण ७२ कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजूर करण्यात

◀◀ पान २ वर

> **चवदार तळ्यास आहे राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा**
>
> उदय सामंत म्हणाले की, महाड शहरातील चवदार तळ्यास राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा असून त्याची देखभाल व दुरुस्ती नगरपरिषदेच्या स्व-निधीतून व शासनाच्या विविध योजनेअंतर्गत प्राप्त अनुदानातून करण्यात येते. रत्नागिरी जिल्ह्यातील आंबडवे या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळ गावी प्रथमच शासकीय जयंती साजरी करण्यात आली असून, तेथे स्मारक उभारणार असल्याची माहिती त्यांनी सभागृहात दिली.

## एमपीएससीची टंकलेखन कौशल्य चाचणी पुढे ढकलली

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची महाराष्ट्र गट ‘क’ सेवा मुख्य परीक्षा– २०२३ लिपिक टंकलेखक व कर सहायक या संवर्गाकरीता १ जुलै, २०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. टंकलेखन कौशल्य चाचणी दरम्यान उद्भवलेल्या तांत्रिक अडचणीमुळे ही परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

१ जुलै २०२४ ते ३ जुलै, २०२४ रोजी टंकलेखन कौशल्य चाचणी नियोजित असलेल्या सर्व उमेदवारांची टंकलेखन कौशल्य चाचणी आयोजित करण्याची सुधारित तारीख स्वतंत्रपणे घोषित करण्यात येईल, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी असे आयोगाने कळविले आहे. या परीक्षेमधील लिपिक टंकलेखक व कर सहायक या संवर्गाकरीता टीसीएस या सेवा पुरवठादार संस्थेमार्फत ०१ जुलै, २०२४ ते १३ जुलै, २०२४ रोजी टंकलेखन कौशल्य चाचणी आयोजित करण्यात आली आहे. तथापि ०१ जुलै, २०२४ रोजी प्रथम सत्राकरिता उपस्थित उमेदवारांना टंकलेखन कौशल्य चाचणीदरम्यान काही तांत्रिक अडचणी उद्धवभल्यामुळे टंकलेखन कौशल्य चाचणी पूर्ण होऊ शकली नाही. यामध्ये उद्भवलेल्या तांत्रिक अडचणीचे निराकरण करण्यासाठी लागू शकणारा वेळ विचारात घेवून ०१ जुलै, २०२४ ते ०३ जुलै, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली टंकलेखन कौशल्य चाचणी पुढे ढकलण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे.

## सभापतींची निलंबनाची कारवाई अन्यायकारक–अंबादास दानवे

**मुंबई । प्रतिनिधी**

**सोमवारी विधान परिषद सभागृहात शाब्दिक चकमकीनंतर सभापती यांनी मंगळवारी केलेल्या निलंबनाच्या कारवाईचा निर्णय हा एकांगी व अन्यायकारक असल्याची प्रतिक्रिया विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी व्यक्त केली.**



पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले की, विरोधी पक्ष नेत्याला एकतर्फी आणि मनमानीपूर्वक निलंबित करणे हा लोकशाहीत विरोधकांना दिलेल्या स्वातंत्र्यावर हल्ला असून विरोधकांच्या आवाज दडपण्याचा प्रकार आहे. कितीही वेळा निलंबन झाले तरी जनतेच्या

◀◀ पान २ वर

## भोले बाबांच्या सत्संग कार्यक्रमात चेंगराचेंगरी मृतांची संख्या ७० वर



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

उत्तर प्रदेशातील हाथरस येथे मंगळवारी (दि. २) एका धार्मिक कार्यक्रमात झालेल्या चेंगराचेंगरीतील मृतांची संख्या ७० वर पोहोचली आहे. मृतांमध्ये महिला, मुले आणि पुरुषाचाही समावेश आहे. तर १०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. दरम्यान, या घटनेची गंभीर दखल उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदिनाथ यांनी घेतली आहे.

◀◀ पान २ वर

> **मुख्यमंत्री योगींनी व्यक्त केला शोक**
>
> हाथरस दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त करताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शोक व्यक्त केला आहे. ‘‘हाथरस जिल्ह्यातील दुर्दैवी अपघातात प्राणहानी अत्यंत दुःखद आणि हृदयद्रावक आहे. शोकाकुल कुटुंबासोबत माझ्या संवेदना आहेत. मदत व बचाव कार्य युद्धपातळीवर राबवून जखमींवर योग्य उपचार करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. अपघाताच्या कारणांचा शोध घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. असे योगी यांनी एका पोस्टमध्ये म्हटले आहे.

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२ जुलै २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ३.५० क्विंटल | २,२७० | २,२७० | २,२७० |
| ज्वारी/हायब्रिड : २४.०० क्विंटल | २,०९१ | २,८४१ | २,३३२ |
| मूग : १.०० क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : १.०० क्विंटल | १०,९५० | ११,००० | १०,९७५ |
| उडीद :०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| बाजरी: ३.०० क्विंटल | २,३०० | २,४४१ | २,३९३ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ७३.५० क्विंटल | ४,५१४ | ४,५१५ | ४,५१४ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ४,७०० | ६,३०० | ५,५०० |

# दुधाला ३५ रुपयांचा भाव जाहीर

## मंत्री विखे पाटील यांची सभागृहात घोषणा, ३० रु. स्थायीभाव तर ५ रु. अनुदान

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना दुधाला प्रतिलिटर एकूण ३५ रुपये दर देण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने मंगळवारी विधानसभा सभागृहात घेतल्याची माहिती पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. पुढे बोलताना राधाकृष्ण विखे–पाटील म्हणाले की, यात दुधाला प्रतिलिटर ३० रु. स्थायीभाव तर शासनाकडून ५ रु. अनुदान देण्यात येणार आहे. त्याचबरोबर दूध भुकटी निर्यातीस प्रोत्साहन मिळावे यासाठी सुद्धा शासनाकडून प्रतिकिलो ३० रु. अनुदान देणाचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगत दुधाचे नवीन दर १ जुलै पासून राज्यभर लागू होतील असेही यावेळी सांगितले.**



आंतरराष्ट्रीय बाजारात दूध भुकटी आणि बटरचे दर कमी झाल्याने त्याचा परिणाम राज्यातील दूध खरेदी दरावर झाला होता. यामुळे दूध उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत आले होते. ही बाब विचारात घेता, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी सोमवारी राज्यभरातील सहकारी तथा खासगी दूध उत्पादक संघ, आणि दूध उत्पादक शेतकरी यांची तातडीची बैठक मंत्रालयात बोलावली होती. सदर बैठकीत आमदार शिवाजीराव कार्डिले, माजी आमदार सदाभाऊ खोत, आमदार विनायक कोरे, आमदार मंगेश चव्हाण, आमदार मोनिका राजळे तसेच राष्ट्रीय डेरी विकास बोर्डाचे अध्यक्ष डॉ. मिनेश शहा आदी मान्यवर उपस्थित होते. या बैठकीत मंत्री विखे पाटील यांनी दूध उत्पादक शेतकरी, आणि दूध संघाच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्यांच्या मागण्या विचारात घेता राज्यातील सर्व खासगी

◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# धोक्याचे पर्यटन टाळलेलेच बरे

प्रत्येक वर्षी जून, जुलै, ऑगस्ट महिन्यातील सुटीच्या दिवसांमध्ये अलीकडच्या काळात घडणाऱ्या दुर्घटनेमुळे आता पर्यटनासाठी बाहेर पडणाऱ्यांना आनंददायी प्रवासाच्या शुभेच्छा पेक्षाही कोठे जपून जावे याची माहिती देण्याची वेळ आलेली दिसते. रविवारी एकाच कुटुंबातील पाच सदस्य वाहून गेल्याच्या दुर्घटनेने पावसाळ्याच्या प्रारंभीच निसर्गाने इशारा दिलेला आहे असे मानायला हरकत नसावी. या बुडालेल्यांमध्ये ४ ते १३ वर्षे वयोगटातील तीन मुली, मुलगा आणि महिलेचा समावेश आहे. घटनास्थळी दाखल झालेल्या लोणावळा पोलिसांनी शिवदुर्ग मित्र बचाव पथकाला पाचारण केले. पथकाने शोधकार्य सुरू केले. मात्र, मुसळधार पाऊस आणि पाण्याचा जोरदार प्रवाह यामुळे बचावकार्यात अडचणी येत गेल्या, तर अथक प्रयत्नानंतर शोध पथकाला तिघींचे मृतदेह पाण्याबाहेर काढता आले. पण ही दुर्घटना टाळता आली असती. संबंधित कुटुंबाला आधीच अशा धोक्याची जाणीव असती तर त्यांनी आपला आणि लहान मुलांचा जीव धोक्यात घातला नसता. मात्र आता त्याबाबत वाईट वाटून घेऊन हे जीव परत येणार नाहीत. त्यामुळे इतरांनी त्यापासून धडा घेणे गरजेचे ठरते.

नद्यांच्या आणि धबधब्यांच्या संपन्न भागात पर्यटनाला लोक प्राधान्य देतात किंवा किल्ला, डोंगर कपारीत ट्रेकिंगचा आनंद लुटण्यासाठी युवावर्ग मोठ्या उत्साहाने जाताना दिसतो. मात्र अशा काळात निर्माण होणारे धोके, निसर्गाचे रौद्र रूप, अचानक वाढणारे पाणी, निसरडे रस्ते, धुके, अपघात प्रवण क्षेत्र अशी स्थानिक माहिती नसलेले लोक हमखास अशा दुर्घटनेचे बळी ठरतात. काही ठिकाणी ठिसूळ झालेले दगड, दरड कोसळून दुर्घटना घडल्याचे पहायला मिळते. त्यामुळे अशा ठिकाणी जाताना स्थानिक स्थितीची माहिती घेतल्याखेरीज जाणे धोकादायकच ठरते. अर्थात तरुणाईला धाडसासाठी असा प्रदेश खुणावत असतो. त्यांनी त्याला प्रतिसाद देऊ नये असे नाही. पण, आपल्या जीवाचे आणि आपल्या सहकाऱ्यांचे रक्षण करून सुरक्षितपणे असे पर्यटन करणे ही आजची गरज आहे. हे लक्षात घेऊन काळजी घेतली तर दुर्घटना घडत नाहीत हे तितकेच खरे. त्यासाठी खूप अडचणीची ठिकाणे शोधण्यापेक्षा पोहोचण्यासाठी सोपे असलेल्या ठिकाणांवर सुट्टीच्या दिवशी किंवा विकेंडला प्रचंड गर्दी होते हे लक्षात घेऊन आखणी करणे शक्य आहे. तसेच काही अवघड ठिकाणी पोहोचणे आपल्याला शक्य आहे का किंवा तिथे सुरक्षिततेसाठी काही व्यवस्था आहे का यावर नक्की विचार केला जाणे आवश्यक ठरते. त्यादृष्टीने विचार करून वर्षा पर्यटनासाठी किंवा ट्रेकिंगसाठी जाणे शक्य आहे. आपण कुठे चाललो आहोत याची कोणाला तरी माहिती असणे गरजेचे असते. शिवाय ज्या ठिकाणी चाललो तिथला नकाशा, परिसराची माहिती, स्थानिक जाणकार किंवा मदतनीस, माहितगार सोबत असणे गरजेचे असते. अनेकदा गुगल मॅपवर भरवसा ठेवून लोक दूर जंगलात अडकून पडल्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. धुके, अंधार यांचा सामना करण्यासाठी साहित्य सोबत ठेवणे, पुरेसे अन्न, औषधे सोबत राखणे गरजेचे असते. या सगळ्या बाबींकडे दुर्लक्ष होतं. अलीकडच्या काळात सर्वात जास्त दुर्घटना या सेल्फी काढण्याच्या नादात घडताना दिसत आहेत. अनोळखी ठिकाणी जी सावधानता बाळगणे आवश्यक आहे ती न बाळगता त्याकडे दुर्लक्ष करणे आणि सेल्फी घेणे अनेकांना अडचणीत आणणारे ठरत आहे. तो फोटोच त्यांचा अंतिम फोटो ठरतो अशाही दुर्घटना वारंवार घडत आहेत. निसरड्या वाटेवर, दगड निसटल्याने किंवा तोल जाऊन अनेकांनी आपला जीव गमावला आहे. हे टाळता येणे शक्य असते. मात्र थोडेसे दुर्लक्ष, अनावश्यक धाडस जीव घेऊन जाते. मागे उरते ती फक्त हळहळ. आपल्या तरुण मुलांनी असे फुकापासरी जीव गमावलेले कोण सहन करू शकेल? मात्र अनेक कुटुंबावर आज ही दुर्दैवी वेळ आली आहे. थोड्याशा सावधानतेने हे टाळता येऊ शकते आणि तरुणाईला पर्यटनाचा आनंद देखील मिळू शकतो. मात्र त्यासाठी आवश्यक शिस्त पाळण्याची गरज आहे. स्थानिक ग्राम पंचायती, पोलीस यांनीही हे गांभीर्याने घेऊन आपापल्या भागात तशी सुधारणा केल्यास त्या प्रदेशाची बदनामी देखील थांबेल याचा विचार व्हायला हवा.

# बंडू खांडेकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयुष्मान भारतचे कार्ड वाटप

## दिंद्रुड येथे देवदूत प्रतिष्ठानचा अभिनव उपक्रम



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**केंद्र व राज्य सरकारच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या आयुष्मान भारत योजनेच्या लाभार्थ्यांना मोफत कार्ड वाटप करण्याचा कार्यक्रम सोमवारी संपन्न झाला. देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडुजी खांडेकर यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या कार्डच्या माध्यमातून गरजवंतांना पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळतील.**

दिंद्रुड येथील ओम साई शिल्प निवासस्थान येथे आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली पिवळे, केशरी व पांढरे रेशन कार्डधारकांना आयुष्मान भारत योजनेच्या कार्डचे वाटप करण्यात आले. श्री गा.बाल विनायक लालसरे महाराज, योगेंद्र मठ संस्थान मोरगांव (अष्टविनायक), सिंदफणा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिवाजीभाऊ रांजवण, पंचक्रोशीतील विविध गावचे सरपंच, प्रतिष्ठित नागरिक यावेळी उपस्थित होते. दिंद्रुड व परिसरातील लाभार्थी आवश्यक कागदपत्रे घेऊन या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते. देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने दिंद्रुड येथे सतत विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. प्रतिष्ठाणचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी आयूष्मान भारत योजनेच्या कार्डधारकांना ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करून मोफत कार्ड वाटप करण्यात आले. भविष्यात विविध आजारांवर शासकीय सुविधे अंतर्गत पाच लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय सुविधा आयुष्मान भारत कार्डच्या लाभधारकांना मिळणार आहेत.

# जनहित याचिकांच्या माध्यमातून सर्व सामान्यांच्या प्रश्नांसाठी झगडणारे

## ॲड.नरसिंह जाधव आष्टी विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढविणार

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाणी प्रश्न असो की, रस्त्याच्या प्रश्न असो जनतेच्या हिताच्या प्रश्नावर जनहित याचिकांच्या माध्यमातून सर्व सामान्यांच्या प्रश्नावर आवाज उठविणारे ॲड. नरसिंह जाधव हे आता विधानसभा निवडणूकीच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीत असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांना आष्टी- पाटोदा- शिरूर विधानसभा मतदार संघातून उमेदवारी देण्याची मागणी आष्टी- पाटोदा आणि शिरुर तालुक्यातील कार्यकर्त्यांनी पक्षाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे केली आहे.**



ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव हे मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ वकिल संघाचे विद्यमान अध्यक्ष, सन १९७८ पासून राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे निष्ठावान, स्नेही आणि खंदे समर्थक मा. पंचायत समिती सभापती कै. ॲड. लक्ष्मणराव जाधव यांचे चिरंजीव ॲड. नरसिंह जाधव यांना २०२४ मध्ये होऊ घातलेल्या विधानसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून उमेदवारी देण्याची मागणी आष्टी- पाटोदा- शिरूर मतदार संघातील कार्यकर्त्यांनी केली आहे. ॲड. नरसिंह जाधव हे २८ वर्षापासून मा. उच्च न्यायालयात वकिली व्यवसाय करत असून त्यांनी अनेक जनहितार्थ याचिका लढवलेल्या आहेत तसेच आष्टी- पाटोदा- शिरूर अनेक भ्रष्टाचार झालेली प्रकरणे उघडकीस आणून व त्यास कायदेशीर मार्गाने न्यायालयासमोर सादर करून शासनाचे व जनतेचे करोडो रुपयाचे झालेले नुसाकन थांबवलेले आहे. तसेच सामान्य माणसाचा न्यायाचा आवाज म्हणून त्यांनी उच्च न्यायालयामध्ये कामकाज केलेले आहे. आष्टी- पाटोदा- शिरूर येथील रस्ता, पाणी आणि विविध विकास कामांना सामान्य माणसापर्यंत पोहचवण्यासाठी अडथळा ठरत असलेली यंत्रणा आणि गडगंज गुत्तेदार यांना त्यांनी आपल्या कामाने चांगलीच अद्दल घडवलेली आहे. ॲड. नरसिंह जाधव हे गेले अनेक वर्षापासून आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्याशी एकनिष्ठ असून राष्ट्रवादी काँग्रेस विधी सेल चे उपाध्यक्ष तथा मराठवाडा प्रमुख म्हणून देखील काम पहात आहेत, नुकत्याच झालेल्या बीड लोकसभेच्या निकालात ॲड. नरसिंह जाधव व त्यांचे बंधू पक्षाचे पाटोदा तालुका अध्यक्ष शिवभूषण जाधव यांनी महत्त्वाची भूमिका निभावलेली आहे आणि सर्वच निवडणुकीत निष्ठेची नाळ जोडलेले सामान्य जनता त्यांच्या बाजूने निरपेक्ष भावनेने नेहमीच उभा असते. यांची निष्ठा आजकालच्या फोडाफोडीच्या राजकारणात, धनशक्तीच्या विरोधात सह्याद्री सारखी उभा असतेः सर्व जातीधर्मांना सोबत घेऊन सामाजिक कार्य त्यांची नेहमीच चालू असतात. जाती धर्माच्या पलिकडे त्यांचा आष्टी मतदार संघात त्यांचा जीवाला जीव देणारा नातेवाईक, मित्रपरिवार आहे, त्यांनी कायम गरीव, कष्टकरी, शेतकरी, कामगार, दिनदलित, दुबळ्यांच्या अनेक समस्यांना त्यांनी वाचा फोडलेली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत सामान्य मतदार वर्गातून येत्या विधानसभेसाठी त्यांनी आष्टी विधानसभा मतदार संघातून आदरणीय शरदचंद्र पवार गटाकडून उमेदवारी मिळावी अश्? मागणी होत आहे.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना पाटोद्यात प्रभावीपणे राबवणार–दिपाली जाधव

**पाटोदा। प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये '' मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजना '' घोषित केलेली आहे यामध्ये रुपये १५००/ महिलांच्या खात्यामध्ये जमा होणार आहेत ही योजना १ जुलै पासून चालू होणार आहे सदर योजना महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत राबवल्या जाणार आहे अशी माहिती पाटोदा नगरपंचायतच्या नगराध्यक्ष सौ दिपाली जाधव यांनी दिली आहे. या योजनेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहे.**



१) २१ ते ६० वर्ष वयोगटातील विवाहित, परितकत्या, विधवा, महिला २) त्या महाराष्ट्रातील रहिवासी असल्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र ३) उत्पन्नाचे रू २.५० लाखापेक्षा जास्त नसावे म्हणजे कुटुंब प्रमुखाचे उत्पन्न अडीच लाखापर्यंत असावे ४) बँकेमध्ये सदर महिलेच्या नावे खाते असावी ५) रेशन कार्ड मध्ये सदर महिलेचे नाव असावे सदर योजना अंतर्गत सोमवार पासुन सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी '' नारी शक्ती दुत ॲप '' प्ले स्टोअर वरून आपल्याला देण्यात आलेल्या मोबाईल मध्ये डाऊनलोड करून घ्यावयाचे आहे व आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पात्र महिलांची नोंदणी महत्वाचे सर्वात पहिले अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी आपली नोंदणी या योजनेअंतर्गत पुढील आठवड्यात सोमवार ते बुधवार पर्यंत १००% करून घेण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची नोंदणी सदर ''नारी शक्ती दुत ॲप'' मध्ये करून घेण्याची जबाबदारी अंगणवाडी पर्यवेक्षिका यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे नोंदणी करत असताना १)उत्पन्नाचा दाखला सण २०२५ पर्यंत वैद्य असणारा असावा २) जन्माचा दाखला असावा /टि.सी झेरॉक्स असावी ३)रेशन कार्ड ची झेरॉक्स असावी ४) आधार कार्ड ५) लाभार्थी नावाने बॅक पासबुक झेरॉक्स सर्व माहिती ॲप मध्ये अंगणवाडी सेविका यांनी भरावयाची आहे सोबत आधार कार्ड असणे आवश्यक आहे या व्यतिरिक्त अंगणवाडी सेविकेला गावातील इतर पात्र असणाऱ्या २१ ते ६५ वयोगटातील महिलांना सुद्धा आवश्यक कागदपत्र तयार करून गावातील सेतू केंद्रातून किंवा ग्रामसेवकांच्या माध्यमातून अर्ज १ ते १५ जुलै २०२४ या कालावधी गावातील कोणतीही २१ ते ६५ वयोगटातील पात्र असणारी महिला ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'' पासुन वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व अंगणवाडी सेविका मदतनीस यांनी घ्यावी गावातील जेवढे ग्रुप असतील त्या सर्व ग्रुपमध्ये या योजनेबाबत माहिती टाकावी काही आवश्यकता असल्यास त्यांनी बाल विकास प्रकल्प अधिकारी तसेच संबंधित बीटच्या पर्यवेक्षिका किंवा पाटोदा नगरपंचायत मध्ये येऊन संपर्क साधावा असे आवाहन पाटोदा नगरपंचायतच्या नगराध्यक्ष सौ दिपाली राजू (भैय्या) जाधव यांनी केले आहे

# संपादक नामदेव क्षीरसागर यांना आष्टी तालुका पत्रकार संघाच्या वतीने श्रद्धांजली

**आष्टी । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा पत्रकारितेतील भीष्माचार्य म्हणून संपूर्ण बीड जिल्ह्यातच नव्हे तर सबंध महाराष्ट्रात आपली एक वेगळी ओळख निर्माण करणारे तसेच अहमदनगर परळी बीड रेल्वे साठी खऱ्या अर्थाने ज्यांनी त्याला मूर्त रूप देण्याचे योगदान दिले असे दैनिक चंपावती पत्रचे संपादक नामदेव क्षीरसागर यांना आज आष्टी तालुका पत्रकार संघाच्या वतीने आष्टी शहरातील पत्रकार भवन येथे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.**

दैनिक चंपावतीपत्रचे संपादक तथा बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेतील भीष्म पितामह म्हणून ज्यांना संबोधले जायचे असे नामदेवराव दादा क्षीरसागर यांचे मंगळवारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले.त्यांच्या निधनाने जिल्ह्याने एक ज्येष्ठ,अभ्यासू आणि सामाजिक प्रश्नांची जाण असलेले व्यक्तिमत्त्व गमावल्याची भावना आष्टी तालुका पत्रकार संघाच्या वतीने या श्रद्धांजली कार्यक्रमात व्यक्त करण्यात आली. ज्येष्ठ संपादक नामदेवराव क्षीरसागर यांनी आपल्या दैनिकाच्या माध्यमातून सर्व सामान्य माणसाला न्याय देण्याचे काम केले. तसेच बीड जिल्ह्यामध्ये रेल्वे आणण्यातही त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.यावेळी आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण पोकळे यांच्यासह जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल भाऊ सहस्त्रबुद्धे, ज्येष्ठ संपादक उत्तमराव बोडके, सरपंच परिषद महाराष्ट्र मुंबईचे प्रदेशाध्यक्ष पत्रकार दत्ता काकडे, पत्रकार विनोद ढोबळे, रघुनाथ कर्डिले, शरद तळेकर,संतोष सानप, शरद रेडेकर, मनोज पोकळे, गणेश दळवी,सचिन रानडे हे उपस्थित होते.

# नामदेवराव क्षीरसागर यांच्या निधनाने पत्रकारिता क्षेत्राची हानी–उमेश मोगरेकर



**माजलगाव । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्याचे आग्रजांनी दैनिक चंपावती पत्राचे संपादक नामदेवराव क्षीरसागर यांच्या निधनाने बीड जिल्ह्यातील नव्हे तर मराठवाड्यातील पत्रकार क्षेत्राची हानी झाली असल्याचे प्रतिमान पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर यांनी केले ते येथील शासकीय विश्रामगृहावर आयोजित श्रद्धांजलीच्या कार्यक्रमात बोलत होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संपादक प्रदीप कुलकर्णी हे होते**

नामदेव क्षीरसागर यांनी साठ वर्षापेक्षा जास्त वर्ष या पत्रकार क्षेत्रात घालवले असून त्यांनी साठ वर्षांपूर्वी दैनिक चंपावती पत्र हे वर्तमानपत्र काढून जिल्ह्यातील प्रश्नांची मांडणी या वर्तमानपत्रात करून ते सोडवण्यासाठी वेळप्रसंगी आंदोलने केली तसेच आपल्या वर्तमानपत्रातून कोणाचेही चारित्र्य हरण होणार नाही याची काळजी घेत पत्रकारिता केली विशेष म्हणजे त्यांचे वर्तमानपत्रावर एवढे प्रेम होते की त्यांचे निधन होण्याअगोदर त्याने आपला अंक प्रकाशित केला होता आशा या महान संपादकास त्यांच्या पावलावर पाऊल टाकून आपण पत्रकारिता करावी हे त्यांना श्रद्धांजली ठरेल असे प्रतिपादन केले यावेळी साप्ताहिक परिसर चे संपादक प्रदीप कुलकर्णी यांनी आपले श्रद्धांजलीपर विचार मांडताना मला पत्रकार म्हणून कै. नामदेवराव यांनी आपल्या दैनिकात संधी देऊन मला मार्गदर्शन केले त्यामुळेच आज मी पत्रकारिता क्षेत्रात स्वतःचे वर्तमानपत्र चालवत असून त्यांच्यामुळेच मी घडलो असल्याचे सांगितले त्यानंतर तुकाराम बापू येवले यांनी आपले मनोगत व्यक्त करताना नामदेवराव यांच्या पत्रकारितेचा आदर्श आपण सर्वांनी घ्यावा असे आवाहन उपस्थित त्यांना केले या कार्यक्रमावर मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष हरीश यादव, सुधाकरराव देशमुख, कमलेश जाब्रश, महेंद्र मस्के, तानाजी शिरसाट, परमेश्वर सोळंके, विष्णू उगले, अरविंद ओव्हाळ, वैजनाथ धायतिडक , राजरत्न डोंगरे, दिनकर शिंदे, राज गायकवाड, दत्ता येवले यांच्यासह बहुसंख्य पत्रकार उपस्थित होते.

## पान १वरून...

### विधानपरिषदेसाठी पंकजाताई

कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. विधानपरिषदेच्या अकरा जागांसाठी येत्या १२ जुलै रोजी निवडणूक होत असून मंगळवारी उमेदवारी दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. भाजपने पंकजाताईसह आपल्या पाच उमेदवारांची घोषणा सोमवारी केली होती. सकाळी ११ वा. पंकजाताईंनी विधानभवनात जावून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी त्यांनी श्री सिध्दिविनायकाचे दर्शन घेतले, त्यानंतर घरी आई प्रज्ञाताई, माजी खासदार डॉ.प्रितमताई, यशःश्रीताई यांनी त्यांचे औक्षण केले.

**कार्यकर्त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू**

विधानभवनात जाण्यापूर्वी पंकजाताई सकाळी त्यांच्या वरळी येथील कार्यालयात दाखल झाल्या. सकाळपासूनच परळी, बीडसह मराठवाडा व राज्यातील विविध जिल्ह्यातून आलेल्या कार्यकर्त्यांनी त्यांना भेटण्यासाठी मोठी गर्दी केली होती. या सर्वांना भेटून त्या अर्ज दाखल करण्यासाठी रवाना झाल्या. पुन्हा दुपारी एक वा. पासून सायंकाळपर्यंत त्या कार्यकर्त्यांना भेटल्या. त्यांच्या शुभेच्छांचा स्विकार करत त्यांच्याशी संवाद साधला. लोकसभा निवडणुकीत झालेला निसटता पराभव कार्यकर्त्यांना अतिशय जिव्हारी लागला होता. उमेदवारी मिळाल्यानंतर मात्र कार्यकर्ते पंकजाताईंना भेटताना डोळ्यातील आनंदाश्रू लपवू शकले नाहीत.

----------

### आज परळी बंद!

आरोपीचे समर्थन करायचे इतकेच नाही तर उलटपक्षी परळीची आणि आमच्या नेत्यांची बदनामी करायची, हे वाचाळवीर रोहित पवारांना शोभत नाही, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेसचे परळी शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी केले आहे. दरम्यान, बुधवार दि. ०३ जुलै रोजी परळी शहर पूर्णपणे बंद असणार असून याबाबतचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने उपविभागीय अधिकारी व तहसील कार्यालयास देण्यात आले आहे. तसेच सर्व व्यापारी बांधवांनी व नागरिकांनी या बंदला सहकार्य करावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, युवक आघाडीचे तालुकाध्यक्ष गोविंद कराड व पदाधिकारी यांनी केले आहे.

------------

### चवदार तळ्याचे लवकरच

येईल. नवीन प्रस्तावानुसार चवदार तळ्याशी संबंधित संपूर्ण विकास कामे करण्यात येतील, असे मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत आज प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य संजय गायकवाड यांनी प्रश्न उपस्थित केला होता. सदस्य बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, नितीन राऊत, अनिल देशमुख, किशोर जोरगेवार यांनीही यावेळी उपप्रश्न उपस्थित केले. पुढे बोलताना मंत्री उदय सामंत म्हणाले की, चवदार तळ्यातील पाणी शुद्धीकरणासाठी सद्या ऑरगॅनिक बायोटेक या कंपनीकडून दरमहा मायक्रोबाएबल कल्चरचे मिश्रण तलावात सोडून पाणी शुद्धीकरण केले जात आहे. ही पाणी शुद्धीकरण यंत्रणा कार्यान्वित असून अमृतसर येथील सुवर्ण मंदिराच्या धर्तीवर ओझोनवर आधारित प्रक्रिया करुन चवदार तळ्यातील पाण्याचे शुद्धीकरण करण्यात येईल. याबाबतचा प्रस्ताव समाजकल्याण विभागाकडे प्राप्त झाला आहे. या प्रस्तावाला १५ दिवसात उच्चस्तरीय समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

----------

### नीट परिक्षाप्रश्नी संसदेत चर्चा

परिणाम २ कोटींहून अधिक विद्यार्थ्यांवर झाला आहे. इतर परीक्षा पुढे ढकलण्याची आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या महासंचालकांची बदली करण्याचे सरकारचे पाऊल म्हणजे केंद्रीकृत चाचणी प्रणालीतील बिघाड झाकण्यासाठी चाललेली चाल आहे, असा आरोप देखील राहुल गांधी यांनी पत्रातून केला आहे.

-----------

### सभापतींची निलंबनाची कारवा

हितासाठी आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी लढत राहू, असा निर्धारही यावेळी व्यक्त केला. अंबादास दानवे पुढे बोलताना म्हणाले की, सभापती यांनी विधिमंडळ सभागृहात ठराव व चर्चा न घेता ठरवून पक्षपातीपणे निलंबनाची कारवाई केली आहे. भाजपाकडे असलेल्या पाशवी बहुमतावर विरोधी पक्षनेते यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. एकप्रकारे लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम हे भारतीय जनता पार्टी करत असल्याचा आरोपही यावेळी केला. अंबादास दानवे पुढे बोलताना म्हणाले की, यापूर्वीही केंद्रात १५० खासदारांचे निलंबन करून भाजपाने आपण लोकशाही किती मानतो हे दाखवून दिले आहे. सभागृहात शिष्टाचार पाळला गेला पाहिजे, ही माझी नेहमीच भूमिका राहिली आहे. त्याबाबत मी सभागृहात दिलगिरी व्यक्त करणार होतो. मात्र सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी मला माझी भूमिका मांडू दिली नाही, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

---------------

### भोले बाबांच्या सत्संग कार्यक्रमात

हाथरस येथील रतीभानपूर येथे भोले बाबांच्या सत्संग कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सांगता होताच चेंगराचेंगरी झाली.या दुर्घटनेत आतापर्यंत ६० ते ७० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती, जिल्हा दंडाधिकारी आशिष कुमार यांनी शी बोलताना दिली आहे. महिलांसह काही मुलांवर उपचार सुरु आहेत. जखमींची संख्या पाहता मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. भोले बाबांच्या सत्संग कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. कार्यक्रम संपल्यानंतर मंडपातून बाहेर पडताना एकच गर्दी उसळली. चेंगराचेंगरी झाली. महिला आणि मुले गर्दीत चेंगरली गेली. वाचवायला कोणीच नव्हते. सर्वत्र आरडाओरडा सुरू होता. सर्वांना उपचारासाठी एटा मेडिकल कॉलेजमध्ये आणण्यात आले. उपचारापूर्वीच अनेकांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले.

----------

### दुधाला ३५ रुपयांचा

तथा सहकारी दूध संघाने शेतकऱ्यांना प्रतिलिटर ३० रु. भाव देण्याचे सर्वानुमते निश्चित केल्याचे सभागृहाला सांगितले. त्यानंतर शासन शेतकऱ्यास ५ रुपये प्रतिलिटरचे अनुदान दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करेल. जेणे करून शेतकऱ्याला प्रतिलिटर ३५ रुपये मिळून शेतकऱ्यांना दिलासा मिळेल असे सांगितले. मागील काही दिवसांपासून आंतरराष्ट्रीय बाजारात दूध पावडर आणि बटरची मागणी कमी झाल्याने त्यांचे दर घसरत आहेत. यामुळे राज्यात दूध पावडरचा मोठा साठा शिल्लक आहे. पण याबाबत ही राज्य शासनाने उपाययोजना म्हणून राज्यातील जे दूध प्रकल्प भुकटी निर्यात करतात त्यांना प्रोत्साहन म्हणून प्रतिकिलोसाठी ३० रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. ही अनुदानाची मर्यादा १५ हजार मॅट्रिक टन करिता असेल. तसेच शेतकऱ्यांची अनुदान प्रणाली अधिक साधी आणि सोपी केली जाईल. ज्या शेतकऱ्यांचे अनुदान रखडले आहे त्यांच्यासाठी १५ जुलै पर्यंत शासनाच्या संकेतस्थळावर माहिती अद्यावत करण्याची मुदतवाढ सुद्धा देण्यात आल्याचे सांगितले. शासन राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, शेतकऱ्यांच्या दुधाला रास्त बाजारभाव मिळण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी यावेळी सांगितले.


## टी.सी.हरवला आहे

चंद्रशेखर रामेश्वर घायतिडक या नावाचा १० दहावी पासचा टी.सी माजलगाव ते लातूर बसप्रवास करत असताना हरवला आहे. तरी ज्या कोणाला मिळून आल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.

:::संपर्क::::

मो.८९७५०२८५७८,७०३८७२७२५५

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. ०३ जुलै २०२४



## विद्यार्थीप्रिय मुख्याध्यापक विनायक राजमाने सेवानिवृत्त

**परळ । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील मोहा येथील महाराष्ट्र माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विनायक राजमाने हे विहित वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.सोमवार दि १ रोजी त्याच्या सेवापूर्ती गौरव सोहळा महाराष्ट्र विद्यालयाच्या प्रांगणात संपन्न झाला.

महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा संचलित परळी तालुक्यातील ग्रामीण भागात असलेली सर्वात मोठी शाळा असलेल्या महाराष्ट्र विद्यालयाचे मुख्याध्यापक विनायक राजमाने २८ वर्ष सेवा बजावून सेवानिवृत्त झाले.सेवापूर्ती निमित्ताने सोमवार दि १ रोजी त्याचा गौरव सोहळा शाळेच्या प्रांगणात संपन्न झाला.या प्रसंगी संस्थेचे सचिव एड.अजय बुरांडे,जेष्ठ संचालक सुदामदादा देशमुख, सुदाम शिंदे,केंद्र प्रमुख विश्वंभर चेनलवाड, माजी मुख्याध्यापक भगवान बडे, उपमुख्याध्यापक मुरलीधर बोराडे, मुख्याध्यापक सुरेश बुरांडे आदी सह राजमाने परिवारांचे स्नेही,नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बीड जिल्ह्यात दोन लाख ५३ हजार ९७५ हेक्टरवर कापूस लागवड; सोयाबीन,उडीदाचे क्षेत्रही वाढले

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये सुरुवातीलाच चांगला पाऊस झाल्याने जिल्ह्यामध्ये कापूस लागवडीसह बाजरी, मका तूर आदी पिकांची लागवड ही जवळपास पूर्ण झाली आहे.

जिल्ह्यात दोन लाख ५३ हजार ९७५ हेक्टरवर कापसाची लागवड झाली आहे. ही सरासरी ७१ टक्के असून उडीद व सोयाबीनचे क्षेत्र सरासरीपेक्षा जास्त वाढले आहे मागील वर्षी २८ ८६८ हेक्टर मध्ये उडीदाची पेरणी झाली होती आता हे प्रमाण ३५ हजार ५२९ सेक्टर म्हणजे १२३% झाले आहे. तर सोयाबीनच्या क्षेत्रामध्ये वाढ होऊन हे प्रमाण १४५ टक्के एवढे झाले आहे मागील वर्षी दोन लाख २६ हजार २३४ सेक्टरवर सोयाबीनची पेरणी झाली होती मात्र यावर्षी हे क्षेत्र वाढून तीन लाख २८ हजार ५९ हेक्टरवर सोयाबीनची पेरणी झालेली आहे .



बीड जिल्ह्यामध्ये सरासरी ८० टक्के पेरण्या पूर्ण झालेल्या दिसत आहेत. बीड जिल्ह्यामध्ये काही क्षेत्र वगळता सर्वत्र पाऊस चांगला झाला. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या वेळेवर करून घेतल्या. बीड जिल्ह्यामध्ये सरासरी ३,५५,४९३ हेक्टर मध्ये कापसाची लागवड केली जाते यावर्षी आतापर्यंत २, ५३ ,९७५ हेक्टरवर कापसाची लागवड केली आहे. हे प्रमाण ७१ टक्के आहे. यामध्ये बीड ७७%, पाटोदा ३ % आष्टी ३३% शिरूर ९१ % माजलगाव ७६% गेवराई ९९% धारूर ८७% वडवणी ७८% अंबाजोगाई ६१% केज ६% तर परळी ९१ % पाटोदा आणि केज वगळता सर्वत्र बऱ्यापैकी कापसाची लागवड झाली आहे. जिल्ह्यामध्ये भात पिकाची लागवड कुठेही झाली नाही. बाजरी एकूण क्षेत्रापैकी २७ हजार ७०० हेक्टरवर बाजरीची पेरणी करण्यात आली. दरवर्षी हे क्षेत्र ६९ हजार ४८५ इतके असते म्हणजे ४०% क्षेत्रात बाजरीची पेरणी पूर्ण झाली आहे. यामध्ये बीड तालुका ३९% पाटोदा ४१ % आष्टी ६२% शिरूर २०% माजलगाव ५% गेवराई १९% धारूर ६४% वडवणी ३८ टक्के अंबाजोगाई ९% केज ३४% तर परळी मध्ये ८६ टक्के क्षेत्रात बाजरीची पेरणी पूर्ण झाली आहे .इतर तृणधान्यामध्ये

बीड ११ टक्के २% टक्के आष्टी ८४८% म्हणजे हे क्षेत्र वाढले आहे शिरूर माजलगाव गेवराई धारूर वडवणी या ठिकाणी तृणधान्य पेरणी झाली नाही तर अंबाजोगाई मध्ये तृणधान्याच्या पेरणीमध्ये वाढ होऊन ती ११२% पर्यंत गेली आहे. तर केज मध्ये २० टक्के पेरणी झाली आहे. परळीत मात्र अद्याप पेरणी करण्यात आली नाही. तुरीच्या क्षेत्रामध्ये बीड तालुका ५८% पाटोदा २८% आष्टी १०७% शिरूर १११ % माजलगाव ४४% गेवराई १०२% वडवणी ७७% अंबाजोगाई ५४% केज ७२ टक्के परळी ९५% इतकी लागवड झाली असून आष्टी शिरूर आणि गेवराई तालुक्यामध्ये तुरीची लागवड सरासरीपेक्षा जास्त झाली आहे. मुगाच्या क्षेत्रामध्ये ४३ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली असून ९३२१ हेक्टर ही पेरणी पूर्ण करण्यात आली आहे .याचे सरासरी प्रमाण २१८ ७६ हेक्टर एवढे आहे. यामध्ये बीड ६०% पाटोदा ७०% आष्टी १९% शिरूर ८७% माजलगाव १२% गेवराई ४५% धारूर ६१ % वडवणी ४८% अंबाजोगाई ७२% केज ६२% तर परळी मध्ये ८७% क्षेत्रावर मुगाची पेरणी पूर्ण झाली आहे .याबरोबरच भुईमुगाचे क्षेत्र जिल्ह्यात केवळ १७ टक्के पूर्ण झाले असून यामध्ये बीड ४% शिरूर ३१ % गेवराई १५% धारूर १९% वडवणी १३% अंबाजोगाई २२ % केज मध्ये ३%परळीत मात्र हे प्रमाण १७८ टक्क्यावर गेले आहे. याचे सरासरी क्षेत्र २३ हेक्टर असून जवळपास ४१ हेक्टरवर भुईमुगाची पेरणी झाली आहे. सूर्यफुलाची सरासरी मात्र अत्यंत कमी असून केवळ१% क्षेत्रावर सूर्यफुलाची लागवड झाली आहे .गेवराई मध्ये सात टक्के सूर्यफुलाची लागवड झाली आहे. जिल्ह्यात तिळाची लागवड केवळ ८% झाली असून सोयाबीनचे प्रमाण मात्र वाढलेले दिसत आहे. हे प्रमाण मागच्या वर्षी पेक्षा जवळपास ४५ टक्क्यांनी वाढले आहे. सरासरी दोन लाख २६ हजार २३४ हेक्टरवर सोयाबीनची पेरणी अपेक्षित होती मात्र प्रत्यक्षात ३ लाख २८ हजार ५९ हेक्टर वर ही पेरणी पूर्ण झाली आहे. जिल्ह्यात कारळ ८% टक्के ,इतर तेलबिया ३% अशी सरासरी असून सर्वाधिक लागवड कापूस आणि सोयाबीन ची झाल्याचे दिसून येत आहे .सोयाबीनचे क्षेत्र सर्वच ठिकाणी वाढलेले दिसत असून बीड १९२ पाटोदा १४९ आष्टी २४३ शिरूर १९९ माजलगाव ११७ गेवराई ७१ धारूर २०३ वडवणी २२९ अंबाजोगाई ११६ केज १७१ तर परळी मध्ये १०२% सोयाबीनची पेरणी पूर्ण झाली आहे.

## लिडकॉमने प्रलंबित मागण्या मान्य न केल्यास नानासाहेब घोडके यांचा आमरण उपोषणाचा इशारा

माजलगाव । प्रतिनिधी

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे (लिडकॉम) प्रलंबित जुने व नवे कर्ज प्रकरणे मंजुरकरून सहभाग भरलेले प्रकरणाचे धनादेश लाभार्थ्यांना तात्काळ वाटप करून महामंडळास कायमस्वरूपी व्यवस्थापक देण्यात यावा या व इतर आपल्या हक्काच्या व न्याय्य मागण्यांचे निवेदन देऊन प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याची विनंती राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्हाअध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी काल मुंबई येथील महामंडळाच्या प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन व्यवस्थापकीय संचालक धम्मज्योती गजभिये यांच्याकडे निवेदनाद्वारे करुन १५ दिवसात या न्याय्य मागण्या मान्य न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

नानासाहेब घोडके यांनी काल दि. २ जुलै २०२४ रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महामंडळास जवळ जवळ सात ते आठ वर्षांपासुन बजेट नसल्या कारणे कर्ज प्रकरणे करता आलेली नाहीत. तसेच कोरोना काळात चर्मकार समाजाचे पैश्या अभावी व्यवसाय बंद पडलेले आहेत. त्यामुळे समाजाची उदरनिर्वाहासाठी कौटुंबीक हाल अपेष्टा होत आहेत. तरी शासनाने आपल्या महामंडळास १ हजार कोटी रु. मंजुर केल्यामुळे २०२३ पासुन कर्जप्रकरणे चालु करण्यात आलेली आहेत. आपल्या मंडळामध्ये बीड जिल्ह्यातील सर्व चर्मकार बांधवांनी दाखल केलेले



नविन (एकुण ११) मुदती कर्ज प्रकरणे व जुने (एकुण २०) मुदती कर्ज प्रकरणे तात्काळ मंजुर करण्यात यावेत. तसेच नविन (एकुण ०३ ) शैक्षणिक कर्ज प्रकरणांना प्राधान्याने मंजुरी देण्यात यावी.

जुन्या लघुऋण वित्त योजनेअंतर्गत मंजुरी प्राप्त झालेल्या (एकुण ३४), जुन्या मुदती कर्ज योजना अंतर्गत मंजुरी प्राप्त झालेल्या (एकुण १५), नविन मुदती कर्ज योजना अंतर्गत मंजुरी प्राप्त झालेल्या (एकुण २२), नविन महिला अधिकारीता योजना अंतर्गत मंजुरी प्राप्त झालेल्या (एकुण ०३), व नविन लघुऋण वित्त योजने अंतर्गत मंजुरी प्राप्त झालेले ०२ लाभार्थ्यांचे धनादेश तात्काळ वाटप करण्यात यावेत. तसेच संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ बीड कार्यालयास कायमस्वरूपी व्यवस्थापक देण्यात यावा.

जिल्हा पातळीवर दि.०२/०८/२०२३ रोजी दैनिकामध्ये महामंडळाने जी जाहीरात दिली होती त्या जाहिरातीमध्ये कमी टार्गेट दिलेले होते त्यामुळे चर्मकार समाजाने कर्ज प्रकरणे दाखल केले नाहीत. तरी नविन प्रति जिल्हा कर्ज प्रकरणाचे टार्गेट तात्काळ देऊन नविन कर्ज प्रकरणे चालु करण्यात यावीत.असेही निवेदन राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्ह्या अध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी दिले आहे. यावेळी धम्मज्योती गजभिये यांनी निवेदनात दिलेल्या मागण्या १५ दिवसात मंजूर करण्यात येतील अस्वासन दिले आहे. १५ दिवसांच्या आत प्रलंबीत प्रकरणांना मंजुरी देऊन मंजुर झालेल्या योजनानिहाय अंतर्गत मंजुरी प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांचे धनादेश १५ दिवसांच्या आत देण्यात यावे नसता लोकशाही मार्गाने आमरण उपोषण जिल्हा कार्यालयासमोर करण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहिल असा इशारा राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी यांनी दिला आहे.



**मुंबई येथील राष्ट्रवादी भवन मध्ये प्रा.अमर शेख यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पक्षाच्या पदवीधर संघटनेच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड केली, यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेब यांच्या हस्ते नियुक्तीपत्र दिले,याप्रसंगी पदवीधर संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ नरेंद्र काळे साहेब आणि वर्धा चे प्रा. कराळे गुरुजी उपस्थित होते.सदरील निवडीनंतर देशाचे नेते,पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. खा. शरदचंद्रजी पवार साहेब यांची भेट घेत आशीर्वाद घेतल्यानंतर सर्वांनीच अभिनंदन करून शुभेच्छांचा वर्षाव केला.**

## सामाजिक उपक्रमातुन माजी मंत्री बच्चु कडूंचा वाढदिवस साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

दिव्यांग बांधवांचे कैवारी शेतकऱ्यांचे नेते प्रहारचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू यांचा येत्या दि ०५ जुलै रोजीच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दि ०२ जुलै मंगळवार रोजी माजलगाव शहरातील जिल्हा परिषद कन्या शाळेमधील दिव्यांग विध्यार्थीनी कु.उजमा शहा या विध्यार्थीनीच्या हस्ते शालेय साहित्याचे उदघाटन करून चारशे विद्यार्थींना शालेय साहित्य वाटप करून केला वाढदिवस साजरा करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी माजलगाव प्रहारच्या वतीने शहरातील अनेक शाळेमधील प्रत्येकी चारशे विद्यार्थी विद्यार्थिनींना शालेय साहित्य



वाटप करून माजी मंत्री आ.बच्चु कडु यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.यावेळी प्राहारचे तालुकाध्यक्ष गोपाळ पैंजणे,शाळेतील मुख्याध्यापक मिलिंद गरबडे, दिनकर वाघमारे, मंदा सारूक, बाळासाहेब सोनावणे, बाळासाहेब कांबळे, इत्यादी शिक्षकांनी परिश्रम घेतले तर प्रहारचे नितीन कांबळे,भारत डोंगरे,लक्ष्मण गरड, विजय जोगडे, रामेश्वर कलापुरे, अनिल देशमुख, अविनाश ढगे, सुशांत कोल्हे, अभिषेक शिंदे, कृष्णा नीरडे, बजरंग सुळ व इतर प्रहारचे पदाधिकारी उपस्थित होते.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविणार - ॲड.जगतकर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील ज्येष्ठ नागरिक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा कुणबी विकास मंच सभागृह, मुकुंदराज रोड येथे रविवार, दिनांक ३० जून रोजी आयोजित करण्यात आली होती.

या सभेच्या अध्यक्षस्थानी संघाचे अध्यक्ष ॲड.अनंतराव जगतकर हे होते. तर व्यासपीठावर पुंडलिक पवार, मनोहर कदम, कोषाध्यक्ष श्रीरंग चौधरी, सचिव लक्ष्मणराव गोरे, उद्धवराव बापू आपेगावकर, नारायणराव केंद्रे, पद्माकर सेलमोकर, दत्तात्रय आंबाड, सहसचिव शिवाजी शिंदे इत्यादी पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. सभेची सुरूवात सानेगुरूजींच्या प्रार्थनेने झाली. जुन महिन्यात ज्यांचा वाढदिवस आहे अशा ४० ज्येष्ठांचे मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प देवून अभिष्टचिंतन आणि नवीन सदस्यांचे स्वागत करण्यात आले. गत आर्थिक वर्षातील सर्व क्षेत्रातील दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. व्यासपीठावरील मान्यवरांच्या स्वागतानंतर कोरम




अभावी अर्धा तास सभा तहकूब करून पुढे अध्यक्षांच्या परवानगीने सभा पुन्हा सुरू करण्यात आली. यावेळी सचिव लक्ष्मणराव गोरे यांनी ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्याचा वार्षिक अहवाल चार भागात तसेच ३० ते ३५ विविध मुद्द्यांवर कृती कार्यक्रम सादर केला. वार्षिक अहवाल वाचनानंतर संघाचे आजीव सभासद शुल्क पुर्वीप्रमाणेच कायम ठेवण्याच्या निर्णयाचे उपस्थित सर्व १२५ सभासदांनी टाळ्या वाजवून स्वागत केले. यानंतर संघाचे कोषाध्यक्ष श्रीरंग आबा चौधरी यांनी लेखापरीक्षण अहवाल याचे वाचन केले. त्यामध्ये तेरिज पत्रक, ताळेबंद, नफा तोटा पत्रक यावर सविस्तर अहवाल सभागृहासमोर ठेवताना संघाने केलेला खर्च, संघाचे आजीव सभासद शुल्क, एफडी वरील प्राप्त व्याज याचा उल्लेख केला. संघाचे माजी सचिव मनोहर कदम यांनी सन २०२३-२४ मधील लेखादोष दुरूस्ती वाचून दाखवत त्यास सभागृहाची मान्यता घेतली. व दिनांक १७ जून २०२४ रोजी ऑडिट रिपोर्ट सीए व्ही.बी वालवडकर यांचेकडून प्राप्त झाला असल्याचे सांगितले. उपस्थित सर्व सभासदांनी टाळ्यांच्या कडकडाटात याचे स्वागत केले. आगामी वर्ष २०२४-२५ चे वार्षिक अंदाजपत्रक संघाचे सहसचिव शिवाजी शिंदे यांनी सादर केले. त्यास उपस्थित सर्वांनी हात वर करून मंजुरी दिली. शेवटी अध्यक्षीय समारोप करताना संघाचे अध्यक्ष ॲड.अनंतराव जगतकर यांनी अनेक नवनविन संकल्पना जाहीर केल्या ज्यात ज्येष्ठांसाठी विरंगुळा सेंटर, नगरपालिका गार्डन, हास्य क्लब, संघाचे स्नेहसंमेलन, ज्येष्ठ नागरिक संघाकरिता नवीन जागेचा शोध घेत आहोत हे नमूद केले. तसेच पंडित उद्धवराव बापू अपेगावकर यांचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात येईल याचा आवर्जून उल्लेख केला. उपस्थितांचे आभार प्रसिद्धीप्रमुख मनोहर कदम यांनी

पान ६ वरून...

### राजकिशोर मोदी यांच्याकडून

संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे अंबाजोगाई शहरात टाळ मृदुंगाच्या गजरात मोठ्या उत्साहात आगमन झाले. संत श्री गजानन महाराज यांच्या पालखीच्या स्वागतासाठी रस्त्यावर रांगोळी काढून अंबानगरी सज्ज झाली होती.दोन दिवसांच्या परळी येथील मुक्कामानंतर पालखीचे आज दुपारी अंबाजोगाई शहरात आगमन झाले. टाळ मृदंगाच्या तालावर शेकडो वारकऱ्यांनी ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकारामांच्या गजरात ठेका धरला. पंढरीनाथ महाराज की जय, विठ्ठल विठ्ठल श्रीहरी विठ्ठल, संत गजानन महाराज की जय, गण गण गणात बोते या जयघोषाने एकापाठोपाठ सुंदर अश्या चालीवर भजन करत या वारकऱ्यांनी अंबाजोगाई शहर अक्षरशः दणाणून सोडले.

पूर्वी या पालखी सोहळ्यामध्ये हत्ती घोडे असा लवाजमा असायचा परंतु गेल्या काही वर्षापासून फक्त आश्वच या सोहळ्यामध्ये सहभागी होत आहे. प्रस्थानाच्या मार्गावर विविध गावांमध्ये शहरांमध्ये संत गजानन महाराज पालखीचे उत्स्फूर्तपणे स्वागत आणि पूजा केल्या जात होती.पालखीचे हे ५५ वे वर्ष असून पालखीत शेगाव येथून तीन अश्व आणि ७०० वारकरी सहभागी आहेत. यात काही टाळकरी तर काहींच्या हाती भगव्या पताका आहेत. हा संत गजानन महाराज पालखी सोहळा हा अत्यंत शिस्तबद्ध व विशिष्ट अशा चौकटीत मार्गक्रमण करणारा म्हणून ओळखला जातो.श्री संत गजानन महाराज पालखीचा मुक्काम अंबाजोगाई शहरातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार असून रात्री भजन कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. दिनांक ०३ बुधवार सकाळी संत गजानन महाराज यांच्या पालखीचे पंढरपूरसाठी अंबाजोगाई शहरातून प्रस्थान होईल.

### महावितरण कार्यालयासमोर

अभियंता गुंगेवार यांनी चार दिवसात वीज पुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासित केले.तर आठ दिवसात वीज पुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेकापचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्यासह भाई मुंजा पांचाळ,भाई विष्णू शेळके, बाजीराव ताकट, उपसरपंच वैजनाथ टेकाळे,नीलाराम टोळे,जयराम कोरडे,विलास घाटूळ,माऊली चंदनशिव, राधाकृष्ण काळे, करण राऊत,भागवत ताकट,माऊली ताकट,वसंत सोळंके,भास्कर जाधव,पपल गायकवाड,उद्धव तात्या सरवदे,पांडुरंग माने, रमेश गिरी,वैभव चंदनशिव,तुकाराम गिरी,गणेश काठोडे,गोविंद काळे,गणेशराव काळे,गणेश माने, श्रीराम तिवे, विलास राऊत, अरुण काळे आदींनी दिला आहे.

### वसंतराव नाईक जयंती

व योजनांच्या माध्यमातून साधलेल्या प्रगतीबाबत मनोगत व्यक्त केले. तालुका कृषी अधिकारी सुरेश ढाकणे यांनी कृषी विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या खरीप हंगाम जनजागृतीची माहिती देऊन विविध योजनांची तसेच वसंतराव नाईक यांच्या जीवन चरित्राची माहिती दिली. राजेसाहेब हारे यांनी सद्यस्थितीत सोयाबीन पिकामधील कीड व्यवस्थापन बाबत माहिती दिली. ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी गोगलगाय, हुमणी किडींचे व्यवस्थापन तसेच सोयाबीन, तूर पिकामधील कीड-रोग यांची निरीक्षणे दाखवून व्यवस्थापनाच्या उपाययोजना संदर्भात विस्तृतपणे मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे शून्य मशागत तंत्रज्ञानाचे टप्पे समजावून सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा समृद्धी दिवाने यांनी विषमुक्त अन्नासाठी एकात्मिक कीड-रोग-अन्नद्रव्य व्यवस्थापनाचा अवलंब करण्याबाबत आवाहन केले तसेच गटशेतीच्या, काढणीपश्चात प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून आर्थिक विकास साधण्याबाबतीत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी विस्तार अधिकारी के ए सुपेकर यांनी केले यावेळी तालुक्यातील मंडळ कृषी अधिकारी, पंचायत समितीचे कृषी अधिकारी प्रवीण मोरे, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहायक, आत्माचे कर्मचारी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उद्योजक उमेश

या अचानक जाण्याने त्याच्या कुटुंबावर दुःख चा डोंगर कोसळला त्याच्या पश्चात एक भाऊ दोन मुल एक मुलगी सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे अमृत लाल लोढा याच्या पार्थिवावर चौसाल येथील स्मशानभूमीत सायंकाळी साडे सहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले त्यावेळी चौसाल बीड परिसरातील प्रतिष्ठित व्यापारी लोकप्रतिनिधी व परिचित मोठ्या संख्येने उपस्थित होते लोढा कुटुंबीयांना या दुःखद प्रसंगातून सावरण्याची सामर्थ्य ईश्वर देवो हीच सर्वांच्या वतीने ईश्वर चरणी प्रार्थना करण्यात आली या घटनेने लोढा कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात प्रजापत्र परिवार सहभागी आहे

पान ६ वरून...

### मराठवाडा शिक्षक संघाचे धरणे

मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक तथा माजी अध्यक्ष पी.एस. घाडगे,मार्गदर्शक तथा माजी सरचिटणीस व्ही.जी.पवार,विद्यमान अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, एस.जी.गुठे सहसचिव एन.जी.माळी, टी.जी.पवार, रेखाताई सोळुंके,कोषाध्यक्ष ए.बी.औताडे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अशोक मस्कले, बंडू अघाव, जी.जी.रातोळे, मधुकर जोंधळे, आरिफ कुरेशी, प्रेमदास राठोड, फारुख जमादार, एस.एस.तिर्थकर, जी.पी.कौशल्य, ए.डी.पाटोदेकर, दिनेश पाटील, एन.टी.सोळंके, विक्रम कदम, बी.ए.वऱ्हाड, सुर्यवंशी यांच्यासह जिल्हाध्यक्ष कालीदास धपाटे, जे.एस.शेरखाने, व्यकंट चिलवरवार, मकरंद यशवंत, कैलास हळदे,रमेश आंधळे, बसवेश्वर स्वामी, हरिभाऊ भडके,जिल्हासचिव गणेश आजबे, भाई चंद्रकांत चव्हाण, जी.व्ही.माने,संजय यळवंते,रवींद्र वाकोडे, एन.टी.कदम, विक्रम मायाचारी, वसंत ढेंगळे यांच्यासह मराठवाडा विभागातील सर्व जिल्हा,तालुका व शहर कार्यकारणीच्या पदाधिकारी, सदस्यांनी केले आहे.

### परळीसह जिल्ह्यात

मुंडे यांचे नाव जाहीर होताच राज्यभरातील कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. परळी शहरात राणी लक्ष्मीबाई टॉवर, छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच पंकजाताईंच्या यशःश्री निवासस्थानी कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी केली तसेच गुलाल उधळून एकच जल्लोष केला. जिल्ह्यात बीड, आष्टी, पाटोदा, शिरूर, केज, अंबाजोगाई आदींसह विविध ठिकाणी कार्यकर्त्यांनी वाजतगाजत पेढे वाटून आनंद व्यक्त केला.

# राज्यातील पोल्ट्री व्यावसायीक आक्रमक

## ‘या’ मागणीसाठी आजपासून उपोषणाचा इशारा!

पुणे : महाराष्ट्र राज्यातील पोल्ट्री व्यावसायिक येत्या ३ जुलैपासून आपल्या प्रलंबित मागण्यासाठी लाक्षणिक उपोषण करणार आहेत. हे उपोषण पुणे येथील राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त यांच्या कार्यालयावर करण्यात येणार आहे, अशी माहिती मावळ तालुका पोल्ट्री संघटनेचे अध्यक्ष एकनाथ गाडे यांनी दिली.



राज्यातील सुमारे दहा लाख पोल्ट्री व्यावसायिक यांनी या उपोषणाला सक्रिय पाठिंबा दिला आहे. आपल्या प्रलंबित मागण्यासाठी ते हे आंदोलन करत आहेत. राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त कौस्तुभ दिवेगावकर यांच्या कार्यालयावर हे उपोषण करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य पोल्ट्री योद्धा संघटनेचे अध्यक्ष अनिल खामकर व सचिव विलास साळवी तसेच कार्याध्यक्ष शरद गोडांबे, नंदू चौधरी, सर्जेराव भोसले, एकनाथ गाडे, सुभाष केदारी यांनी हे नियोजन केलेले आहे. राज्यातल्या बहुतेक जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी या उपोषणाला बसणार आहेत. मावळ तालुक्यातून या उपोषणासाठी गाडे यांच्यासह, कार्याध्यक्ष सुभाष केदारी, सचिव प्रवीण शिंदे, महेश कुडले, उत्तम शिंदे, संभाजी शिंदे, विनायक बदले प्रयत्न करीत आहेत.

वीज बिल माफ करावे

पोल्ट्री योजना संघटनेच्यावतीने सरकारने पोल्ट्री व्यवसायासाठी लागू केलेली गाइड लाइन महाराष्ट्र सरकारने अंमलबजावणी करावी. ग्रामपंचायतीने आकारलेली अवास्तव घरपट्टी रद्द करावी. वीज बिल माफ करावे, आदी मागण्या अनेक वर्षे प्रलंबित आहेत, त्याची सोडवणूक होईपर्यंत हे उपोषण चालणार असल्याचे संघटनेने सांगितले आहे.

## आता २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदामासाठी मिळणार ५०% अनुदान!

पुणे : अन्नधान्याचे अधिक उत्पादन यामुळे गोदामाचे महत्व सर्वांनाच आता कळले आहे. राष्ट्रीय अन्न व पोषण अभियान कडधान्य आणि राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत २०२४-२५ या आर्थिक वर्षात २५० मेट्रिक टन क्षमतेचे गोदाम बांधकामासाठी शेतकऱ्यांना मोठी मदत मिळणार आहे. विविध केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत या गोदाम बांधकामासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% किंवा जास्तीत जास्त १२ लाख ५० हजार रूपयांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. शेतमाल साठवणुकीसाठी योग्य आणि माफक दरातील सुविधा उपलब्ध करून देणे हे योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामुळे शेतकऱ्यांना आपला शेतमाल योग्य वेळी आणि योग्य किंमतीला विकण्यास मदत होईल. तसेच, योजनेमुळे शेतमालाचे नुकसान कमी होण्यास मदत होईल आणि शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास हातभार लागेल. या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी शेतकरी उत्पादक संघ आणि कंपन्यांनी पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


योजनेचे फायदे : २५० मेट्रिक टन क्षमतेचे गोदाम बांधकामासाठी ५०% अनुदान. अनुदान रक्कम थेट शेतकरी उत्पादक कंपनी/संघाच्या खात्यात जमा. बँक कर्जासह योजना राबवणे शक्य. शेतकऱ्यांना कृषी माल साठवण्यासाठी योग्य आणि माफक दर.

असा करा अर्ज : तालुका कृषी अधिकारी किंवा मंडळ कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करा. सातबारा, आधारकार्ड, बँक खात्याचा तपशील अशी

आवश्यक कागदपत्रे लागतात. अर्ज जमा करण्याची अंतिम तारीख: ३१ जुलै २०२४



## चांगल्या दुग्धोत्पादनासाठी चाऱ्यावर युरिया ट्रीटमेंट करा



उपचाराने चाऱ्याचे पौष्टिक मूल्य वाढते आणि चारा मऊ, चविष्ट आणि प्रथिनांनी युक्त बनतो. एवढेच नाही तर चाऱ्यातील ऑक्सलेटचे प्रमाणही कमी होते. जनावरांपासून चांगले दूध उत्पादन घेण्यासाठी हिरवा चारा व पशुखाद्य आवश्यक आहे. परंतु हिरवा चारा नेहमीच उपलब्ध होत नाही आणि जनावरांच्या चाऱ्याच्या किंमतीमुळे प्रत्येक शेतकऱ्याला त्याचा वापर करणे शक्य होत नाही. त्यामुळे दूध उत्पादनात घट दिसून येत आहे. भाताचा पेंढा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. पण ते अतिशय कठीण, चविष्ट, अपचन आणि कमी प्रथिनेयुक्त आहे. त्यात ऑक्सलेटही मोठ्या प्रमाणात असते. जे शरीरातील कॅल्शियमसोबत एकत्र होऊन कॅल्शियम ऑक्सलेट तयार होते आणि शरीरातून बाहेर टाकले जाते, त्यामुळे जनावरांना कॅल्शियमची कमतरता भासते आणि जनावरांना अनेक आजार होतात. अशा परिस्थितीत त्यावर उपचार करून जनावरांना चारा देणे आवश्यक आहे.

चारा उपचार आवश्यक : उपचाराने चाऱ्याचे पौष्टिक मूल्य वाढते आणि चारा मऊ, चविष्ट आणि प्रथिनांनी युक्त बनतो. एवढेच नाही तर चाऱ्यातील ऑक्सलेटचे प्रमाणही कमी होते.

उपचार पद्धती कशी आहे? : १ क्विंटल चारा जमिनीवर ६ इंच थरात पसरवा. ४ किलो युरिया ५० लिटर पाण्यात पूर्णपणे विरघळवून चाळणीच्या साहाय्याने चाऱ्यावर फवारणी करावी.


त्यानंतर आधीच पसरलेल्या चाऱ्यावर पुन्हा १ क्विंटल चारा टाकून पुन्हा ४ किलो युरिया ५० लिटर पाण्यात विरघळवून चाळणीच्या साहाय्याने फवारणी करावी. अशाप्रकारे युरियाच्या द्रावणाची फवारणी केल्यास एका वेळी ५-१० क्विंटल पॅरा तयार होतो. चाऱ्याचा हा ढीग पॉलिथिनच्या शीटने पूर्णपणे झाकून ठेवा म्हणजे आतील गॅस बाहेर येणार नाही. २० दिवस राहू द्या.

२० दिवसांनी हा चारा जनावरांना खायला तयार होईल. उपचारित पेंढा खाण्याचे फायदे : प्राणी उपचार केलेला पेंढा मोठ्या उत्साहाने खातात. प्रक्रिया केलेला पेंढा खाल्ल्याने प्राणी जलद वाढतात. प्रक्रिया केलेल्या पेंढ्याला खायला दिल्याने जनावरांच्या आहारातील धान्याचे प्रमाण कमी होते, त्यामुळे शेतकऱ्यांच्या पैशाची बचत होते. एकदा तयार झाल्यानंतर प्रक्रिया केलेला चारा दीर्घकाळ साठवता येतो.

# मुळा लागवड तंत्रज्ञान

मूळवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये मुळा हेक्टरी एक महत्वाचे पीक आहे. मुळा हे थंड हवामानातील पीक असून त्याची लागवड प्रामुख्याने रब्बी हंगामात केली जाते. परंतु उष्ण हवामानात चांगल्या वाढू शकणा-या मुळयांच्या जाती विकसित करण्यात आल्यामुळे मुळयाचे पीक जवळ जवळ वर्षभर घेता येते.

हवामान आणि जमीन : मुळा हेक्टरी प्रामुख्याने थंड हवामानातील पीक आहे. मुळयाची वाढ २० ते २५ अंश सेल्सिअस तापमानाला झपाटयाने होते. परंतु चांगला स्वाद आणि कमी तिखटपणा येण्यासाठी मुळयाच्या वाढीच्या काळात १५ ते ३० अंश से. तापमान असावे. मुळयाच्या वाढीच्या काळात तापमान जास्त झाल्यास मुळा लवकर जून होतो आणि त्याचा तिखटपणाही वाढतो. मुळयाची जमिनीतील वाढ चांगली होण्यासाठी लागवड ागवडीसाठी निवडलेली जमीन भुसभूशीत असावी. भारी जमीनीची चांगली मशागत करावी. अन्यथा मुळयाचा आकार वेडावाकडा होतो आणि त्यावर असंख्य तंतूमूळे येतात. अशा मुळयाला बाजारात मागणी नसते. मुळयांची लागवड अनेक प्रकारच्या जमिनीत करता येत असली तरी मध्यम ते खोल भूसभूशीत अथवा रेताड जमिनीत मुळा चांगला पोसतो. चोपण जमिनीत मुळयाची लागवड करू नये.



सुधारीत जाती : पुसा हिमानी, पुसा देशी, पुसा चेतकी, पुसा रेशमी, जपानीज व्हाईट, गणेश सिंथेटीक या मुळाच्या आशियाई किंवा उष्ण समशितोष्ण हवामानात वाढणाऱ्या मुळाच्या जाती आहेत. हंगाम आणि लागवडीचे अंतर : महाराष्ट्रात मुळयांची लागवड वर्षभर करता येते. परंतु मुळयाची व्यापारी लागवड प्रामुख्याने रब्बी हंगामात केली जाते. रब्बी हंगामासाठी सप्टेबर ते जानेवारी हया कालावधीत बियांची पेरणी करावी. उन्हाळी हंगामासाठी मार्च-एप्रिल महिन्यात तर खरीप हंगामासाठी जून ते ऑगस्ट महिन्यात बियांची पेरणी करावी. मुळयाची लागवड करतांना दोन ओळीतील अंतर ३० ते ४५ सेमी आणि २ रोपांमधील अंतर ८ ते १० सेमी ठेवावे.

लागवड : मुळ्याची लागवड सपाट वाफयात किंवा सरी वरंब्यावर केली जाते. दोन वरंब्यामधील अंतर मुळयांच्या जातीवर अवलंबून असते. युरोपीय जातीसाठी हेक्टरी अंतर ३० सेमी ठेवतात. तर आशियाई जातीकरिता ४५ सेमी इतर ठेवतात. वरंब्यावर ८ सेमी अंतरावर २-३ बिया टोकून पेरणी करतात. सपाट वाफयात १५ बाय १५ सेमी अंतरावर लागवड करतात. बियांची पेरणी २-३ सेमी खोलीवर करावी. पेरणी पूर्वी जमिनीत ओलावा असावा. मुळा लागवड अंतर हेक्टरी मुळयाची जात. त्याची वाढ आणि हंगामावर अवलंबून असते. तथापि कमी अंतरावर लागवड केल्यास मध्महिन्यातम आकाराचे मुळे मिळून उत्पादन जास्त मिळते. मुळयाच्या एक हेक्टर लागवडीसाठी १० ते १२ किलो बियाणे लागते.

खते आणि पाणी व्यवस्थापन : मुळयाचे पिक कमी कालावधीत तयार होणारे असल्यामुळे जास्त उत्पादन मिळण्यासाठी या पिकाला खते वेळेवर द्यावीत. जमिनीची मशागत करतांना चांगले कुजलेले शेणखत २५ टन दर हेक्टरी जमिनीत मिसळून द्यावे. मुळयाच्या पिकाला दर हेक्टरी ३० किलो नत्र २० किलो स्फूरद आणि ८० किलो पालाश द्यावे. स्फूरद आणि पालाश यांची पूर्ण मात्रा आणि नत्राची अर्धीमात्रा पेरणीपूर्वी द्यावी. नत्राची उरलेली अर्धीमात्रा ही बी उगवून आल्यावर म्हणजेच पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी द्यावी.

रोग आणि त्याचे नियंत्रण : काळी अळी (मस्टर्ड सॉ फ्लाय) ही एक प्रमुख कीड आहे. लागवड झाल्यावर आणि मुळयाची उगवण झाल्यावर सुरूवातीच्या काळात हया काळया अळीचा उपद्रव मोठया प्रमाणात होतो. हया अळया पाने खातात आणि त्यामुळे पानांवर छिद्रे दिसतात. या अळीच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात २० मिली लीटर एन्डोसल्फान मिसळून पिकावर फवारावे. मावा या कीडीचा उपद्रव ढगाळ हवामानात जास्त प्रमाणात होतो. या किडीची पिल्ले तसेच प्रौढ किडे पानांतील अन्नरस शोषून घेतात. त्यामुळे पाने गुंडाळली जातात. रोप कमजोर होते. पिवळे पडून रोप मरते. या किडीच्या निचंत्रणासाठी १० लिटर पाण्यात २० मिलीलीटर डायमिथेईट मिसळून पिकावर फवारावे. मुळयाच्या पिकावर करपा रोग मोठया प्रमाणावर आढळतो. हया बुरशीजन्य रोगांच्या प्रादुर्भावामुळे पानांवर पिवळे फूगीर डाग अथवा चटटे पडतात. नंतर खोडावर आिा शंगावर पिवळे डाग पडतात. पावसाळी हंगामात रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात होतो. या रोगाच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात २५ ग्रॅम डायथेन एम ४५ हे बुरशीनाशक मिसळून फवारणी करावी. मुळ्याचे उत्पादन हे मुळ्याची जात आणि लागवडीचा हंगाम हयांवर अवलंबून असते. साधारणपणे रब्बी हंगामात मुळयाचे दर हेक्टरी १० ते २० टन उत्पादन मिळते.




### महत्वाच्या घटना

१६०८ : सॅम्यूअल बी. चॅम्पलेन यांनी कॅनडातील क्वेबेक शहराची स्थापना केली.
१६६१ : पोर्तुगीजांनी इंग्लंडचे राजा चार्ल्स द्वितीय यांना मुंबई व तंजौर बेट भेट दिले.
१७६० : मराठा सेनेने दिल्लीवर ताबा मिळविला.
१८५० : इस्ट इंडिया कंपनीच्या अध्यक्षांनी भारतातुन आणलेला ’कोहिनूर’ हिरा इंग्लंडच्या राणीच्या स्वाधीन केला.
१८५२ : महात्मा फुले यांनी दलित मुलांसाठी पहिली शाळा काढली.
१८५५ : भारतात कायदे शिक्षणाचा प्रारंभ झाला.
१८८४ : डाऊ जोन्स हा निर्देशांक सुरू झाला.
१८८६ : जर्मनीच्या कार्ल बेन्झ याने जगातील पहिली मोटारगाडी बनवली.
१८९० : आयडाहो हे अमेरिकेचे ४३ वे राज्य बनले.
१९०८ : इंग्रज सरकारने लोकमान्य टिळकांना देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली.
१९२८ : लंडनमध्ये प्रथमतः रंगीत दूरचित्रवाणी कार्यक्रमांचे प्रक्षेपण झाले.
१९३८ : ‘मॅलार्ड’ हे वाफेचे इंजिन ताशी १२६ मैल (२०२ कि. मी.) वेगाने न्यू कॅसलहून लंडनला पोहोचले. वाफेच्या इंजिनाचा हा वेगाचा विक्रम अजूनही अबाधित आहे.
१९७२ : भारत आणि पाकिस्तान देशांत काश्मीर संबंधी नि:शस्त्र करार झाला.
१९९८ : ’ए मेरे वतन के लोगो ’ या प्रसिद्ध गाण्याचे कवी प्रदीप यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर
२००० : विक्रांत या विमानवाहू युद्धनौकेचे मुंबईच्या समुद्रात ऑयस्टर रॉकजवळ सागरी संग्रहालयात रुपांतर करण्यास नौदल, राज्यसरकार, मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि मच्छिमार प्रतिनिधींनी मान्यता दिली.
२००१ : सुधीर फडके यांना राज्य सरकारचा ’गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार’ जाहीर
२००६ : एक्स. पी. १४ हा लघुग्रह पृथ्वीच्या अगदी जवळुन (साधारण चंद्राइतक्या अंतरावरुन) गेला.
२०१७ : अचल कुमार ज्योती यांची भारताच्या मुख्य निवडणूक आयुक्त पदी निवड करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६८३ : इंग्लिश कवी एडवर्ड यंग यांचे जन्म.
१८३८ : मामा परमानंद पत्रकार व विचारवंत, प्रार्थना समाजाचे एक संस्थापक (मृत्यू: १३ सप्टेंबर १८९३)
१८८६ : रामचंद्र दत्तात्रय तथा ’गुरूदेव’ रानडे आधुनिक विद्याविभूषित तत्त्वज्ञ व संत, फर्ग्युसन व विलींग्डन महाविद्यालयातील तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक (मृत्यू: ६ जून १९५७)
१९०९ : बॅरिस्टर व्ही. एम. तथा ’भाऊसाहेब’ तारकुंडे कायदेपंडित, स्वातंत्र्यसैनिक, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश व सर्वोच्च न्यायालयात सामाजिक समस्यांसाठी लढा देणारे झुंजार कायदेतज्ञ (मृत्यू: २२ मार्च २००४)
१९१२ : श्रीपाद गोविंद नेवरेकर मराठी रंगभूमीवरील लोकप्रिय गायक व नट (मृत्यू: १६ जून १९७७)
१९१४ : दत्तात्रय गणेश गोडसे इतिहासकार, नाटककार, कलादिग्दर्शक, वेशभूषाकार आणि नेपथ्यकार (मृत्यू: ५ जानेवारी १९९२)
१९१८ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते व्ही. रंगारा राव यांचा जन्म. (मृत्यू: १८ जुलै १९७४)
१९२४ : सेलप्पन रामनाथन सिंगापूरचे ६ वे राष्ट्राध्यक्ष
१९२४ : तामीळवंशीय राजकारणी, सिंगापूरच्या प्रजासत्ताकाचे वे६ राष्ट्राध्यक्ष सेल्लप्पन रामनाथन यांचा जन्म.
१९२६ : सुनीता देशपांडे लेखिका व स्वातंत्र्यसैनिक (मृत्यू: ७ नोव्हेंबर २००९)
१९५१ : सर रिचर्ड हॅडली न्यूझीलंडचे क्रिकेटपटू
१९५२ : भारतीय गायक अमित कुमार यांचा जन्म.
१९५२ : भारतीय कॅनेडियन लेखक रोहिनटन मिस्त्री यांचा जन्म.
१९७१ : विकीलीक्स चे संस्थापक ज्युलियन असांज यांचा जन्म.
१९७६ : हेन्री ओलोंगा झिम्बाब्वेचे क्रिकेटपटू
१९७७ : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन माराठी गायक, संगीत नाटक-अभिनेते श्रीपाद गोविंद नेवरेकर यांचा जन्मदिन.
१९८० : हरभजनसिंग भारतीय क्रिकेटपटू
१९८७ : युवसेना जिल्हाअधिकारी जळगाव माननीय प्रितेश ठाकूर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३५० : संत नामदेव यांनी समाधी घेतली. (जन्म: २९ आक्टोबर १२७०)
१९३३ : अर्जेंटिनाचे राष्ट्राध्यक्ष हिपोलितो य्रिगोयेन यांचे निधन. (जम: १२ जुलै १८५२)
१९३५ : सिट्रोएन कंपनीचे संस्थापक आंद्रे सीट्रोएन यांचे निधन. (जन्म: ५ फेब्रुवारी १८७८)
१९६९ : ब्रायन जोन्स ‘द रोलिंग स्टोन्स‘चे संस्थापक, गिटार, हार्मोनिका आणि पियानो वादक (जन्म: २८ फेब्रुवारी १९४२)
१९९६ : कुलभूषण पंडित तथा ’राजकुमार’ ऊर्फ ’जानी’ जबरदस्त आवाजाने संवादफेक करून प्रेक्षकांना खूष करणारा हिन्दी चित्रपट अभिनेता (जन्म: ८ आक्टोबर १९२६)
१९९९ : परमवीर चक्र पुरस्कार सन्मानित गोरखा रायफल्सचे भारतीय सैन्य अधिकारी कॅप्टन मनोज कुमार पांडे यांचे निधन.
२०१५ : भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी (३६वे) सरन्यायाधीश योगेश कुमार सभरवाल यांचे निधन.

# पिंपरनई येथील गणेश नगर वस्तीवरील ग्रामस्थांची चिखलातुन पायपीट

## मातोश्री पाणंद रस्ते योजना ठरतेय मृगजळ

लिंबागणेश

ग्रामीण भागात शेतवस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना अस्तित्वात आली मात्र पावसाळा सुरू होण्यापूर्वी रस्ते काम पूर्ण होणे अपेक्षित असताना पावसाळा सुरू होऊन सुद्धा शासकीय नियमांच्या कचाट्यात योजना सापडली असून प्रसिद्धी माध्यमांद्वारे गाजावाजा करण्यात आलेल्या योजनेचे वास्तव मात्र क्लेशदायक असुन अखेर काही गावांमध्ये ग्रामस्थांनी स्वखर्चाने रस्ते काम करण्यास सुरुवात केली असुन ग्रामस्थांमध्ये तिव्र भावना उमटत आहेत. बीड तालुक्यातील पिंपरनई येथील गणेशनगर वस्तीवरील ग्रामस्थांना मुलांच्या शाळा, बाजारहाट, दवाखाना आदि कामांसाठी सध्या पावसाळ्यात चिखल तुडवीत जावे लागत असल्याने शासनाप्रती तिव्र नाराजी दिसून येत आहे.

बीड तालुक्यातील मौजे.पिंपरनई ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत गणेशनगर वस्ती २५ वर्षांपासून वास्तव्यास






असुन असुन २५-३० घरांचा उंबरठा असलेली १५० च्या जवळपास लोकसंख्या गावापासून १ किलोमीटर अंतरावर असुन रस्ता नसल्याने शालेय मुलांची शाळा,दुधदुभते, भाजीपाला,किराणा, बाजारहाट आदि कामांसाठी पावसाळ्यात गुडघाभर चिखल तुडवीत जावं लागतं.२५ वर्षांपासूनचा आमचा वनवास कधी फिरतोय माहीत नाही अशी उद्विग्न प्रतिक्रिया सरस्वती वायभट यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना दिली. पिंपरनई ग्रुप ग्रामपंचायत असुन गणेश नगर वस्तीवरील मी विद्यमान ग्रामपंचायत सदस्य असुन दिड वर्षांपासून शासन दरबारी कागदपत्रे घेऊन पाठपुरावा केला आहे. ग्रामसेवक यांनी उन्हाळ्यात रस्तेकामासाठी ईस्टीमेट तयार केले असल्याचे सांगतात मात्र रस्त्याचे काम अजूनही सुरू नाही.तातडीने रस्ताकाम सुरू न झाल्यास आम्ही रास्तारोको आंदोलन करणार आहोत. शासनामार्फत मातोश्री पाणंद रस्ते योजनेंतर्गत मराठवाड्यातील ८ जिल्ह्यातुन ९३५० कामे प्रस्तावित असुन मराठवाड्यात २०७३ कामे मंजूर करण्यात आली आहेत त्यापैकी केवळ ६७४ कामांनाच प्रशासकीय मान्यता मिळालेली असुन ६३८ कामांची स्थळ पाहणी करण्यात आलेली आहे.त्यापैकी ५८६ कामांनाच कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.शासनाने मंजुरी दिलेल्या २०७४ कामांपैकी केवळ ४८४ कामेच म्हणजे २३ टक्केच कामे पूर्ण झाल्यामुळे ग्रामीण भागात ही योजना मृगजळ ठरू पहात आहे.त्यामुळे ग्रामीण भागातील शाळा,दुधदुभते, भाजीपाला, बाजारहाट, शेतमाल वाहतुकीचा प्रश्न प्रलंबित आहे.दरवर्षी पेरणीसाठी बि-बियाणे नेताना त्याचबरोबर पिक काढणीनंतर शेतीमाल वाहतुकीसाठी रस्ता नसल्याने शेतक-यांची अडचण होत असुन प्रलंबित पाणंद रस्ता कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत.

# बीड शहरात आणि शहरात भोवती बोअरवेलच्या पाण्यातून येतो फेस

## नगर परीषदेला शहाणपण कधी सुचणार-अँड.अजित देशमुख

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात बऱ्याच बोअरवेल मधून पाणी घेताना असा फेस येत आहे. नगर परिषद हद्दीत नदी- नाल्यांभोवतीचं नाही, तर सर्वदूर हा परिणाम दिसत आहे. आरोग्यासाठी हे घातक आहे. याचा दूरगामी परिणाम आता जनतेला भोगावा लागणार आहे. नगर परिषदेने आता तरी याकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. पण त्यांना हे कधी कळणार ? असा प्रश्न जनआंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी उपस्थित केला आहे. शहरातील सांडपाणी नदी आणि नाल्यांमध्ये मोकाट सोडले जात आहे. यावर प्रक्रिया करण्यासाठी अथवा याचा दुरगामी होणारा परिणाम रोखण्यासाठी नगर परिषद कोणतेही पाऊल उचलत नाही. पाण्यामुळे रोगराई वाढू नये, त्याचप्रमाणे जनतेला आरोग्य जनतेच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ नये, यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.



अशा प्रकारचे दूषित पाणी जमिनीत गेले, विहिरी अथवा बोअरवेल मधून ते बाहेर आले आणि ते जर जनतेने वापरले, तर शरीरासाठी ते घातक आहे. यातून केस गळती होणे, त्वचारोग होणे, एवढेच नाही तर अनेक प्रकारचे आजार जनतेला होऊ शकतात. त्यामुळे नगर पालिकेने आपले कर्तव्य प्रामाणिकपणाने पार पाडणे आवश्यक असते. याकडे लक्ष देणे तर दूरच पण दस्तूर खुद्द नगर पालिका नदी नाल्यांमध्ये आणि शहराच्या भोवती शहरातला कचरा जमा करून टाकते, याची मात्र किव येते. दुर्गंधी पसरवण्यासाठी आणि दूषित पाण्यासाठी पूर्णपणे नगरपालिका प्रशासन दोशी आहे. जनतेचाही यात मोठा सहभाग आहे, हेही नाकारता येत नाही. मात्र नगर पालिका चालविणाऱ्या लोकांना हे कधी कळणार ? हा प्रश्नही येथे उपस्थित होत आहे. नगरपालिका सांडपाण्याच्या प्रक्रिया आणि शुद्धीकरणाकडे लक्ष देत नाहीत. प्रक्रिये विना नदी, नाल्यांमध्ये सोडलेले पाणी पुढील शहरांद्वारे शुद्धीकरणानंतर किंवा ग्रामीण भागांमध्ये शुद्धीकरणाची सोय नसल्याने तसेच वापरले जाते. यातून आरोग्याची हेळसांड होण्यासोबत जलस्रोत व भूजलामध्ये प्रदूषण वाढत जाते. घरगुती सांडपाण्यामध्ये अनेक प्रकारचे केमिकल असतात. हे सर्व अभ्यासले तर हा प्रश्न किती गंभीर आहे, ते दिसते. त्यामुळे नगर पालिकेने जनतेचे आरोग्य सांभाळावे. बघ्याची भूमिका घेवू नये, असेही अँड. देशमुख यांनी म्हंटले आहे.

# अनुसूचित जातीच्या शासकीय निवासी शाळांमध्ये शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया सुरु

बीड । प्रतिनिधी

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यामध्ये ११ शासकीय निवासी शाळा सुरू आहेत. छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यामध्ये वैजापूर येथे, जालना जिल्ह्यामध्ये जालना, भोकरदन, बदनापूर येथे, बीड जिल्ह्यातील पाटोद, शिरूर कासार आणि परळी वैजनाथ येथे आणि परभणी जिल्ह्यातील हदगाव पावडे तालुका शेलु अकोले तालुका जिंतूर, मानवत पूर्णा येथे या शाळा सुरू असून प्रत्येक शाळांमध्ये इयत्ता ६ वी ते १० वी या वर्गासाठी प्रत्येकी ४० जागा असून एका शाळेमध्ये २०० विद्यार्थ्यांची क्षमता असून छत्रपती संभाजी नगर जिल्हामध्ये २२०० विद्यार्थी क्षमतेच्या या शाळेमध्ये मोफत भोजन, राहणे, वहया, पुस्तके, गणवेश इत्यादी पुरविण्यात येतात. तसेच शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी काळजीपूर्वक लक्ष देण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे.

शासकीय निवासी शाळेचे नाव, मुख्याध्यापकाचे नाव व मोबाईल क्रमांक. छत्रपती संभाजी नगर अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा, वैजापूर शिवाजी माळी , जालना अनुसूचित जाती व नवबौध्द मुलींची शासकीय निवासी शाळा जालना, सूर्यकला भीमराव गोसावी, अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, भोकरदन रघुनाथ खेडकर, अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा बदनापूर डॉ. दिलीप गिरी, जिल्हा अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा, पाटोदा एन.एस.तरकसे अनुसूचित जाती व नवबौध्द मुलींची मुलांची शासकीय निवासी शाळा, शिरूर कासार अस्मिता जावळे मोबाईल क्रमांक अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा, परळी वैजनाथ बी.एम. सोनवणे, परभणी अनुसूचित जातीय नवबौध्द मुलींची शासकीय निवासी शाळा मानवत, बी.के. खोडके, अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, हातगाव पावडे तालुका सेलू रवी जोशी, अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा अकोली तालुका जिंतूर बि.एन. कीरकन अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा पूर्णा, हटकर मोबाईल क्रमांक सर्व विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी वरील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधवा, असे आवाहन जयश्री सोनवणे प्रादेशिक उपयुक्त समाज कल्याण विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# जिल्हा परिषदेसमोर शिक्षकांचे धरणे

बीड । प्रतिनिधी

सरकारने माध्यमिक शिक्षकांना वर्ग-२ मधून, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी या पदासाठी पदोन्नतीपासून वंचित ठेवले असल्याने आज जिल्हा परिषद कार्यालय बीड समोर माध्यमिक शाळेच्या शिक्षकांचे धरणे आंदोलन २ जुलै मंगळवार रोजी धरणे आंदोलन केले आहे.




या आंदोलनाचा मुख्य हेतू असा की, राज्य शासनाने दि.२८ डिसेंबर २०२२ रोजी अधिसूचना काढत माध्यमिक शिक्षकांना वर्ग-२ मधून वंचित ठेवून त्यांना शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी या पदासाठी पदोन्नती मिळणार नाही अशी अधिसूचना काढली आहे. तरी जि.प.माध्यमिक शिक्षकांच्या वर्ग-२ पदोन्नतीमध्ये अडसर ठरणार्या शालेय शिक्षण विभागाने काढलेली दि.२८.१२.२०२२ रोजीची अधिसूचना रद्द करुन सेवा प्रवेश नियम १९७८ प्रमाणे राजपत्रित मोकळा करावा अशी मागणी सर्व शिक्षक बांधवांची आहे. तरी या आमच्या आंदोलनाची दखल न घेतल्यास यापुढे राज्याध्यक्ष व्हि.पी. फुलातंबकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली बेमुदत विना अन्न-पाणी घेता उपोषण करण्यात येईल असा इशारा जिल्हा कार्याध्यक्ष सुधाकर सावंत, लाड कांतीलाल, कोंडजकर, खतीब, शहाणे, देशमुख, सवासे यांनी दिला आहे.



बीड : जि.प.प्राथमिक शाळा काळेगाव हावेला येथे वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी करण्यात आली.

# कामगार अधिकारी मुंडे वस्तु साहित्य वाटपात ठेकेदारांचे हट्ट पुरवतात - शेख अमर

बीड । प्रतिनिधी

बाधंकाम कामगांराना गृहोपयोगी वस्तु व सुरक्षा किट साहित्याचे वाटप ठेकेदार (संस्था) यांच्या कार्यालय गोडावुन येथुन वाटप न करता शासन निर्णयानुसार तात्काळ वितरणासाठी तालुका स्तरावर ९ शिबिरे आयोजित करूनच वाटप करावे नसता दिनांक ७ जुलै २०२४ पासुन महाराष्ट्र बाधंकाम सघटनेच्या वतीने बीड जिल्हा कामगार अधिकारी यांच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसणार असे सघंटनेचे संस्थापक अध्यक्ष अमर शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख नसीर, बीड महिला अघाडी अध्यक्ष संजीवनी राऊत यांनी दिलेल्या निवेदनातून म्हटले आहे.



महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचा प्रस्ताव ०१.२०२१ च्या शासन आदेशानुसार घरगुती वस्तूंच्या वितरणाच्या योजनेला शासनाने मान्यता दिली आहे. मंडळाच्या नोंदींमध्ये १८.०३.२०२१ च्या खरेदी समितीच्या गट क्रमांक ०१ आणि मे ०२ च्या गट क्रमांक ०२ च्या बैठकीत सक्रिय (जिवंत) बांधकाम कामगारांना घरगुती वस्तूंचा पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव मफतलाल इंडस्ट्रीजची स्वीकृती शिफारस २४.११.२०२३ रोजी शासन निर्णयासाठी रु.८८२०/- (वस्तू आणि सेवा कर वगळून) च्या निर्धारित दराने सादर करण्यात आली. सदर प्रस्तावास शासन संदर्भ क्र.०३ दिनांक ०१.१२.२०२३ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर विभागात बांधकाम कामगारांना घरगुती वस्तूंच्या वितरणासाठी निविदा क्रमांक ०१/२०२१. मफतलाल इंडस्ट्रीज लि मंडळाचे पत्र क्र. २१९४ त्यानुसार मे. मफतलाल इंडस्ट्रीज लि. त्यांना दिनाकं २७.१२.२०२३ रोजी शासन मान्यतेनुसार पुरवठादार संस्था गट क्र. ०१- नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर विभागासाठी करार झाल्या प्रमाणेच शासन मान्यतेनुसारच सक्रीय (जिवंत) बांधकाम कामगारांना घरगुती वस्तूंचा पुरवठा, वाहतूक, साठवण आणि वितरण यासाठी घरगुती वस्तूंच्या प्रति संच रु. ८८२०/- अधिक वस्तू आणि सेवा कर पुरवठा ऑर्डरच्या दराने लावला आहे. नागपूर आणि छत्रपती संभाजी नगर विभागातील सहाय्यक कामगार आयुक्त/शासकीय कामगार अधिकारी (कार्यालय प्रमुख) यांनी विहित नमुन्यात सक्रिय (जिवंत) बांधकाम कामगारांनी सादर केलेल्या यादीनुसार आणि कार्यालय प्रमुखांनी प्रमाणित केलेल्या, घरगुती संच वस्तूंचे वाटप केले पाहिजे. ई-निविदा च्या अटी व शर्ती च्या आदेश क्रमाकं ९ आदेश नुसार संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक कामगार आयुक्त/शासकीय कामगार अधिकारी (कार्यालय प्रमुख) यांच्या समन्वयाने स्वखर्चाने घरगुती वस्तूंच्या वितरणासाठी जिल्हा/तालुका स्तरावर ९ शिबिरे आयोजित करावीत तरी निविदेच्या अटी व शर्ती नुसारच हे साहित्य वाटप करावे नसता दिनांक ०७ जुलै २०२४ सोमवार पासुन बीड जिल्ह्यातील महाराष्ट्र बाधंकाम मजूर सघंटना पदाधिकारी बीड जिल्हा कामगार अधिकारी श्री मुंडे यांच्या कार्यालयासमोर बेमुद्दत उपोषनास बसणार असा इशारा सघंटनेचे सस्थांपक अध्यक्ष नगरसेवक अमर शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख नसीर, बीड जिल्हा महिला अध्यक्ष संजीवनी राऊत व त्यांच्या सहकाऱ्यांनी निवेदनातून दिला आहे.

# शासकीय वसतीगृहात प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी अर्ज करावे

बीड: सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अंतर्गत चालविण्यात येत असलेल्या मागासवर्गिय मुला-मुलींचे शासकीय वसतीगृह जि. बीड येथील रिक्त जागेसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. शालेय, महाविद्यालय, व्यवसायक व बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी वसतीगृहात प्रवेश मिळण्यासाठी अर्ज करण्यात यावे. शालेय विद्यार्थ्यांकरिता दि. १२ जुलै २०२४ पर्यंत अर्ज सादर करावा. इयत्ता १० वी व ११ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी व पदव्युत्तर, पदवी, पदविका (व्यवसायिक अभ्यासक्रम वगळून) यांनी दि. ३१ जुलै २०२४ पर्यंत अर्ज शासकीय वसतिगृहात सादर करावे, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त एस. एन मेश्राम यांनी केले आहे.

वसतीगृहाचे नाव व संख्या मुलींचे शासकीय वससतीगृह अंबाजोगाई ८०,धारुर १०० माजलगाव ८०, पाटोदा १००, शिरुर कासार १००, आष्टी ८०, बीड ७५ मुलांचे शासकीय वसतीगृह अंबाजोगाई १००,केज १००, पाटोदा १००, बीड ७५,परळी वैद्यनाथ १०० आणि गेवराई १०० अशी विद्यार्थी संख्या आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती डी.के. पाटील ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ८३५/२०२४**

**अशोक व इतर विरुध्द निरंक  अॅड. उबाळे एम. आर.**

**अर्जदार : १) अशोक पि. पांडुरंग सुरवसे, वयः ३९ वर्षे, धंदाः शेती, रा. जाधववाडी ता. जि. बीड, २) कौशल्याबाई भ्र. अरुण कणसे, वयः ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. पारगांव सिरस ता.जि.बीड ३) ताई भ्र.विकास कानडे, वय : ३४ वर्षे, धंदाः घरकाम, रा.मुळूकवाडी ता. जि.बीड, ४) मिनाबाई भ्र. बबन फणसे, वयः ५६ वर्षे, धंदाः घरकाम, रा. पारगांव सिरस ता. जि.बीड, ५) कमल भ्र.जालिंदर कळसुले, वय ६५ धंदा घरकाम रा.नागझरी ता.जि. बीड, ६) उर्मिला भ्र. शहादेव उबाळे, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम रा.चऱ्हाटा ता.जि. बीड**

विरुष्द निरंक

मागणी अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे शशिकला भ्र.पांडुरंग सुरवसे यांचे बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत नामे शशिकला भ्र. पांडुरंग सुरवसे रा. जाधववाडी, ता.जि.बीड यांचा मृत्यु दिनांक २६/०३/२०२४ येथे झाला. अर्जदार क्र. ०१ मयताचा मुलगा असून अर्जदार क्र. २ ते ६ मयताच्या विवाहीत मुली आहेत. तर अर्जदार क्र. ४ हा मयताची विवाहीत मुलगी आहे. मयतास सदर अर्जदारां शिवाय ईतर कुणीही वारस नाही. वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार व गैरअर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत शशिकला भ्र. पांडुरंग सुरवसे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. **आज दिनांक २७/०६/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक २६/०७/२०२४**

**स्वाक्षरित**
**क. लिपीक**

**आदेशावरुन**
**स्वाक्षरित**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.**



## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.   /२०२४**

**ज्ञानेश्वर पि. भगवान उबाळे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, चऱ्हाटा ता. जि. बीड**

**पहा ज्ञानेश्वर पि. भगवान उबाळे रा.चऱ्हाटा ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत बाजीराव आबाजी उबाळे** यांचा दिनांक ०५/०४/१९४६ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास चऱ्हाटा ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे चऱ्हाटा ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०१/०७/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०२/०८/२०२४ ही आहे.**

मार्फत
**अॅड. एम.आर उबाळे**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**



## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१७५/२०२४**

**साईनाथ लहूभाई घोरपडे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, कांबी ता. जि. बीड**

**पहा साईनाथ लहूभाई घोरपडे रा. कांबी ता. जि. बीड ह.मु.कॅनॉल रोड जहागिरपुरा सुरत**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत महादु बापु घोरपडे** यांचा दिनांक १५/०४/१९१८ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास कांबी ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कांबी ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०१/०७/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०२/०८/२०२४ ही आहे.**

मार्फत
**अॅड. एम.आर उबाळे**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**



## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१७६/२०२४**

**बलभीम पि.बाबासाहेब ढेरे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, कोळवाडी ता. जि. बीड**

**पहा बलभीम पि.बाबासाहेब ढेरे रा. कोळवाडी ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत विश्वनाथ मुगाजी ढेरे** यांचा दिनांक १०/०८/१९०६ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास कोळवाडी ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कोळवाडी ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०१/०७/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०२/०८/२०२४ ही आहे.**

मार्फत
**अॅड. एम.आर उबाळे**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**



## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१७४/२०२४**

**सचिन पि. बाबुराव उबाळे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, चऱ्हाटा ता. जि. बीड**

**पहा सचिन पि. बाबुराव उबाळे रा. चऱ्हाटा ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत सानाजी भाऊ उबाळे** यांचा दिनांक १०/०४/१९८० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास चऱ्हाटा ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे चऱ्हाटा ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०६/०७/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०२/०८/२०२४ ही आहे.**

मार्फत
**अॅड. एम.आर उबाळे**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**

# मला आज जे काही मिळतंय ते पाच जिवांच्या चरणी अर्पण करते

## पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केल्या भावना; पंतप्रधान मोदींसह राज्यातील नेत्यांचे मानले आभार

**मुंबई । प्रतिनिधी**

''मला जीवनात जे काही मिळणार आहे, ते मी त्या पाच जीवांच्या चरणी अर्पण करते. ते आज असते तर त्यांनी घोषणाबाजी केली असती, परंतु ते आता नाहीत तर मला त्यांचं शल्य राहील. त्यांना हे मी समर्पित करते'' अशा शब्दांत भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी विधानपरिषदेची उमेदवारी दाखल करतेवेळी आपल्या भावना व्यक्त केल्या.

पत्रकारांशी बोलताना त्या म्हणाल्या की, ''सर्वप्रथम या दिवसाची सुरुवात सकारात्मकतेने करू इच्छिते. मी आधी सिद्धीविनायकाचं दर्शन घेतलं आणि आता या लोकांना भेटायला आले. ज्यांनी कधीही मला क्षणभरदेखील स्वतःला, स्वतःच्या हृदयपासून दूर ठेवलं नाही. माझ्या सर्व वाईट काळात ते माझ्याबरोबर राहिले. त्यांचं दर्शन घेतलं आणि आता आईचं दर्शन घ्यायला चालले आहे. मग मी अर्ज दाखल करेन.''

मी माझे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, गृहमंत्री अमित शाह, पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यातील नेते देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, सुधीर भाऊ, रावसाहेब दानवे, भुपेंद्र यादव, आशिष शेलार या सर्वच सदस्यांचे आभार मानते, ज्यांनी माझं नाव सुचवलं'', असंही त्या म्हणाल्या. त्या पुढे म्हणाल्या, ''लोकांना प्रतिक्षा करावी लागली. मला हवंय ते करण्यापेक्षा लोकांना हवंय ते राजकारणात करायचं असतं. आता लोकांना हवंय ते झालंय, मी सर्वांचे आभार मानते.''

### माझं यश या पाच जणांना अर्पण

दरम्यान, लोकसभा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर पंकजाताई मुंडे यांच्या काही कार्यकर्त्यांनी आत्महत्या केली. पराभव जिव्हारी लागल्याने त्यांनी आत्महत्या केल्या. याबाबत बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, ''मला जीवनात जे काही मिळणार आहे, ते मी त्या पाच जीवांच्या चरणी अर्पण करते. ते आज असते तर त्यांनी घोषणाबाजी केली असती, परंतु ते आता नाहीत तर मला त्यांचं शल्य राहील. त्यांना हे मी समर्पित करते'', असंही त्या म्हणाल्या.



# राजकिशोर मोदी यांच्याकडून संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे स्वागत

## पालखीच्या ५५ व्या वर्षी ७०० ते ८०० पायी वारकऱ्यांसह अश्वांचा सहभाग

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्राचे श्रद्धास्थान संतश्रेष्ठ शेगाव निवासी गजानन महाराज यांच्या पालखीचे आगमन प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी अंबाजोगाई शहरात मोठया धुमधडाक्यात वाजतगाजत झाले. या पालखीचे स्वागत माजी नगराध्यक्ष तथा श्री योगेश्वरी देवल कमिटीचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या साथीने केले. संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज यांचा पायी पालखी सोहळा मागील ५५ वर्षांपासून निघतो आहे. यापायी पालखी सोहळ्यात शेकडो स्त्री व पुरुष वारकरी सहभागी होताना दिसून येतात. यंदाही या पालखी सोहळ्यात सातशे ते आठशे वारकरी टाळ मृदुंगाच्या तालावर ग्यानबा तुकारामच्या जयघोषात रंगून गेले होते.



अंबाजोगाई करांच्या वतीने संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे स्वागत प्रथेनुसार अंबानगरीचे माजी नगराध्यक्ष तथा श्री योगेश्वरी देवल कमिटीचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केले. गेली पंचवीस ते तीस वर्षाच्या परंपरेनुसार राजकिशोर मोदी यांच्या वतीने श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे स्वागत करण्यात येत आहे. यांच्या सोबत याप्रसंगी अंकुश हेडे,आकाश कऱ्हाड हे उपस्थित होते. याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी यावर्षी भरपूर पाऊस पडू दे, बळीराजा सुखी होऊ दे तसेच सकल अंबाजोगाई वासीयांना निरोगी दीर्घायुष्य लाभो अशी प्रार्थना गजानन महाराज यांच्या चरणी केली. पान ३ वर

### उद्योजक उमेश लोढा यांना पितृशोक



**चौसाळा । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील चौसाळ्यातील महावीर जमिनीचे मालक तथा प्रतिष्ठित व्यापारी व युवा उद्योजक उमेश शेठ लोढा यांचे वडील अमृतलाल बन्सीलाल लोढा वय ७७ यांचे २९ जून रोजी दुपारी बारा वाजून वीस मिनिटांनी त्यांच्या चौसाळा येथील राहत्या घरी तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे चौसाळा परिसरातील प्रतिष्ठित व परिचित व्यक्तिमत्व होते त्यामुळे चौसाळा परिसरातून हळूहळू व्यक्त करण्यात आली यांच्या पान ३ वर

# महावितरण कार्यालयासमोर शेकापचा तब्बल दोन तास ठिय्या

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील महावितरणच्या निष्काळजीपणाबाबत अनेक तक्रारी असतांनाच तालुक्यातील रोशनपुरी, नागडगाव,सांडस चिंचोली, शिंपेटाकळी, देपेगाव, आळसेवाडी या गावांचा तब्बल एक महिनाभरापासून वीज पुरवठा खंडित असून महावितरण च्या गलथान कारभारास गावकरी कंटाळलेले असून याबाबत गावकऱ्यांनी अनेक वेळा लोकप्रतिनिधी कडे तक्रारी करून देखील त्याची दखल लोकप्रतिनिधींनी व प्रशासनातील अधिकाऱ्यांनी घेतली नाही त्याचा परिणाम म्हणून सहा गावातील महिलांना पाण्यासाठी ऐन पावसाळ्यात भटकंती करावी लागत असून पिठाच्या गिरण्या देखील बंद असल्यामुळे तालुक्यातून गावकरी दळण दळून नेत आहेत शिवाय मोबाईल चार्जिंग व डासाच्या त्रासामुळे वाढलेली रोगराई या सर्वांना गावकरी कंटाळले परंतु प्रशासनाला जाग आली नाही. म्हणून शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्या पुढाकारातून दि ०२ जुलै मंगळवार रोजी रोशनपुरी, नागडगाव, शिंपेटाकळी,सांडस चिंचोली,देपेगाव, आळसेवाडी येथील सर्व गावकऱ्यांनी सकाळी १०:०० वाजल्यापासून महावितरण कार्यालयासमोर तब्बल दोन तास प्रचंड घोषणाबाजी करत ठिय्या आंदोलन करून अधिकाऱ्यांना धारेवर धरले यावेळी पान ३ वर



वीज पुरवठा सुरळीत न झाल्यास तिव्र आदोलन करणार - भाई ॲड.नारायण गोले

# बीड शहरामध्ये डॉ.योगेश क्षीरसागर यांनी नागरिकांसोबत घातली गस्त!

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील काही भागात चोरीसत्र सुरूच आहे. याकडे पोलिसांचे दुर्लक्ष होत असून स्थानिक नागरिकांवर गस्त घालण्याची वेळ येत आहे. हा प्रकार नागरिकांनी कानावर घालताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी रात्री साडेअकरा वाजता शहरातील काही भागात भेटी दिल्या. नागरिकांसोबत व्यस्त घालत त्यांच्याशी संवाद साधला. याबाबत त्यांनी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांची बुधवारी भेट घेऊन चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.

बीड शहरातील अंकुश नगर आणि नाथसृष्टी या ठिकाणी गेल्या पंधरा दिवसांपासून चोरट्यांनी अक्षरश: धुमाकूळ घातला आहे. चोरांनी परिसरात आतापर्यंत चार घरफोड्या केल्या आहेत. तसेच, अनेक ठिकाणी चोरीचे प्रयत्न झाले आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आता नागरिकच रात्र गस्त घालत आहेत. मंगळवारी रात्री साडेअकरा वाजता गस्त सुरू असल्याचे नागरिकांनी डॉ.योगेश क्षीरसागर यांना भ्रमणध्वनीवरून कळवले. त्यानंतर त्यांनी अंकुश नगर भागातील कपिल मुनी मंदिर परिसरात भेट देऊन काही वेळ गस्त घालत नागरिकांशी संवाद साधला. दरम्यान, यापूर्वी त्यांनी चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. आता पोलिसांनी कठोर पाऊले उचलून चोरट्यांचा बंदोबस्त करावा अन्यथा निष्क्रिय पोलिसांवर कारवाईची मागणी केली जाईल, असा इशारा दिला आहे.

### चोरीसत्र थांबविण्याची पोलिसांकडे मागणी



### पोलीस अधीक्षकांची घेतली भेट

बीड शहरातील चोरी सत्र थांबवावे. पोलीस पेट्रोलिंग वाढवावी. चोरी झालेल्या गुह्यांचा तपास करावा. बंद पडलेल्या पोलीस चौकी सुरू कराव्यात, अशा मागणीचे निवेदन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना दिले. यावेळी ठाकूर यांनी तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# परळी खून प्रकरण : आरोपींना फरार होण्यास मदत करणाऱ्या चौघांना अटक, मुख्य आरोपी फरार

**परळी । प्रतिनिधी**

बर्लिन तालुक्यातील मरळवाडी गावचे राष्ट्रवादी काँग्रेसचे सरपंच बापू आंधळे यांच्यावर शनिवारी येथील बँक कॉलनीत रात्री ८.३० वाजता गोळीबार करण्यात आला. यात बापू आंधळे यांचा जागीच मृत्यु झाल्या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे उपाध्यक्ष शशिकांत उर्फ बबन गित्ते यांच्यासह पाच जणांविरुद्ध खुनाचा व खून करण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा परळी शहर पोलिस ठाण्यात रविवारी सकाळी दाखल करण्यात आला होता. या आरोपीना फरार करण्यासाठी मदत केलेल्या चौघांना केज आणि धारूर पोलिसांनी अटक केली असून हे आरोपी परळी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहेत.

परळी शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या फिर्यादीनुसार आंधळे यांच्या खून प्रकरणात ग्यानबा उर्फ गोटया मारोती गित्तेच्या तक्रारीवरून बबन गित्तेसह पाच जणांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आर्थिक विषयाच्या वादातून ही घटना घडली होती.बीड जिल्ह्यात घडलेल्या प्रकारामुळे खळबळ उडाली असून पोलिसांनी आरोपीला अटक करण्यासाठी मोहीम गतिमान केली आहे. मुख्य आरोपी व इतर आरोपीना फरार होण्यासाठी त्यांना वाहन उपलब्ध करून देणे तसेच इतर मदत केल्याप्रकरणी आसाराम दत्ता गव्हाणे (वय-२३),मयूर सुरेश कदम (वय-२९), रजतकुमार राजेसाहेब जेधे (वय-२७),अनिल बालाजी सोनटक्के (वय-२३)या चौघाना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मुख्य आरोपी बबन गित्ते व त्याचे साथीदार अद्याप फरार असून पोलीस निरीक्षक संजय लोहकरे व पोलिसांचे पथके आरोपीचा शोध घेत आहेत.

# परळीसह जिल्ह्यात फटाक्यांची आतिषबाजी गुलालाची उधळण करत कार्यकर्त्यांनी केला आनंदोत्सव



**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांना विधानपरिषदेची उमेदवारी जाहीर झाल्याचे समजताच परळीसह संपूर्ण जिल्ह्यात भाजपच्या कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण व फटाक्यांची आतिषबाजी करत आनंदोत्सव साजरा केला. कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह यावेळी पहावयास मिळाला.

विधानपरिषद निवडणुकीसाठी भाजपने आज आपल्या पाच उमेदवारांच्या नावाची घोषणा केली, यादीत पहिल्या क्रमांकावर पंकजाताई पान ३ वर

# वसंतराव नाईक जयंती निमित्त कृषी दिन उत्साहात साजरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंती निमित्त १७ जून ते १ जुलै या कालावधीत कृषी विभागामार्फत 'कृषि संजीवनी पंधरवाडा' मोहीम राबवून कृषी विषयक प्रात्यक्षिक, तंत्रज्ञानाची तसेच खरीप हंगामातील पिकांच्या व्यवस्थापनाची माहिती देण्यात देण्यात आली. पंधरवड्याच्या शेवटच्या दिवशी दि.१ जुलै रोजी वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त पंचायत समितीच्या सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करून प्रगतिशील शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने (काळे), प्रमुख मार्गदर्शक म्हणून ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर व केव्हीकेचे सेवानिवृत्त शास्त्रज्ञ राजेसाहेब हारे उपस्थित होते. कार्यक्रमात प्रगतिशील शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शन पान ३ वर




उत्पादन खर्च कमी करण्यासाठी शून्य मशागत तंत्रज्ञान फायदेशीर : शिवप्रसाद येळकर

# आंतरराष्ट्रीय योग खेळाडू राधा तांबे दोन सुवर्णपदकाच्या मानकरी

**बीड । प्रतिनिधी**

दहावी इंडो नेपाल आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धा २९ जून २०२४ ही नेपाळची राजधानी काठमांडू येथील बोगन विला हॉलमध्ये संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये पारंपारिक योगासन, रिदमिक एकेरी व दुहेरी या प्रकारात घेण्यात आली.

या स्पर्धेमध्ये बीड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र चराटा येथील योग शिक्षिका व राधिका ॲडव्हान्स योगा सेंटरच्या संचालिका श्रीमती. राधा सचिन तांबे (घोलप) यांनी भारताचे प्रतिनिधित्व करताना पारंपारिक योगासन स्पर्धेमध्ये सुवर्णपदक व एकेरी रीदमिक या स्पर्धेमध्ये सुवर्णपदक अशी दोन सुवर्णपदके पटकावली. राधा तांबे यांनी एकेरी रीदमिक या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रीयन पारंपारिक नऊवारी मध्ये योगासने सादर केले. महाराष्ट्राची संस्कृती नऊवारी परिधान करून आसनाचे सादरीकरण केले. या स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने स्पर्धक उपस्थित होते. स्पर्धा समन्वयक सुरेश गांधी यांनी सहकार्य केले. त्यांच्या या यशाबद्दल बद्दल श्रीमती. राधा तांबे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# डी वाय एफ आय व कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

''स्वाराती''ग्रामीण रुग्णालय व महाविद्यालय येथील कर्मचाऱ्यांची राहण्याची सोय म्हणून रुग्णालय परिसरात निवासस्थाने उभारण्यात आले आहे. ती दुरुस्त करून देण्याच्या मागणीसाठी कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयासमोर आज धरणे आंदोलने करण्यात आले. सदरील आंदोलनाला यश आले असून महिनाभरात सर्व कामे करून देण्याचे लेखी आश्वासन संबंधित विभागामार्फत देण्यात आले. त्यामुळे सदरील आंदोलन मागे घेण्यात आले आहे.

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई यांच्या कार्यालय समोर कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या दुरुस्तीसाठी आंदोलनात बसली होते. यावेळी बांधकाम विभागाच्या वतीने लेखी आश्वासन देण्यात आले. महिनाभरामध्ये सर्व कामे करून देण्यात येतील. मागील दोन वर्षांमध्ये जे काम झाले आहेत त्यामध्ये ज्या तुरटी आढळतील त्या दुरुस्त करून देण्यात येतील व जी कामे झाली आहे त्यांच्या प्रमाआठ दिवसात उपलब्ध करून देण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले. व ड्रेनेज दरवाजे खिडक्या किंवा अत्यावश्यक जी कामे आहेत ते तात्काळ सुरू करण्यात येतील असे देखील आश्वासन दिल्यामुळे सदरील आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र महिनाभरात जर दुरुस्ती झाली नाही तर पुन्हा आंदोलन करण्यात येईल असा इशारा त्यावेळी देण्यात आला. यावेळी डी वाय एफ आय चे जिल्हा उपाध्यक्ष सुहास चंदनशीव, तालुकाध्यक्ष देविदास जाधव तालुका सचिव प्रशांत मस्के, पत्रकार संतोष केंद्रे, सिद्राम सोळंके, मुंजाहरी नवगिरे, स्वप्निल ओव्हाळ, दशरथ घुले, अशोक मोराळे, शेळवणे, जगन्नाथ पाटोळे,वागमारे,राऊत आधी या वेळी उपस्थित होते.



# मराठवाडा शिक्षक संघाचे धरणे आंदोलन

## कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहाण्याचे अवाहन

परळी । प्रतिनिधी

राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न राज्यशासनाकडे गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आसून त्यांच्याकडे संबधितांचे लक्षवेधण्यासाठी व त्यांच्या पुर्ततेसाठी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने मराठवाडा विभागातील सर्व शिक्षणाधिकारी (मा.) कार्यालया समोर गुरुवार दि.४ जुलै रोजी दुपारी ठीक ४ ते ६ यावेळेत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. तरी या आंदोलनात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मराठवाडा शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बंडू अघाव यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकानुसार सदरील आंदोलन मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी.एस.घाडगे व व्ही.जी.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार यांच्या नेतृत्वाखाली संपन्न होत आहे.

सर्वांना जुनी पेन्शन,शाळा व तुकड्यांना १००% अनुदान,शिक्षक व शिक्षकेत्तर बांधवांना १०,२०,३० लाभांची आश्वासीत प्रगती योजना,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची रिक्त पदे भरणे,सातव्या वेतन आयोगा प्रमाणे वेतनोत्तर अनुदान, ४% महागाई भत्ता,राज्य कर्मचाऱ्यांचे सेवा निवृत्तीचे वय ६० वर्षे करावे,इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शिक्षणाधिकारी यांच्याकडून वैयक्तिक मान्यता द्याव्यात यासह इतर अनेक मागण्यांसाठी हे एक दिवसाचे लक्षवेधी धरणे आंदोलन करण्यात येत आहे.

तरी या आंदोलनात मराठवाडा विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी बांधवांनी आप आपल्या जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयासमोरील आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करावे असे अवाहन पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे-सोलापूर महामार्गावर टायर फुटल्यानं भीषण अपघात

## ४ जणांचा जागीच मृत्यू

**बारामती । प्रतिनिधी**

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर कारचं टायर फुटल्यानं भीषण अपघात झाला. यामध्ये चार जणांचा जागीच मृत्यू झालाय. इंदापूर तालुक्यातील डाळज येथे दुपारी हा अपघात झाला. अपघात इतका भीषण होता की यामध्ये गीडाच्या पुढच्या बाजूचा पूर्ण चक्काचूर झालाय. अपघातानंतर स्थानिकांनी तात्काळ मदत केली. जखमी प्रवाशाला उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर ब्रिझा गाडीचा टायर फुटून झालेल्या अपघातात चार जण जागीच ठार झाले.. तर एक जण गंभीर जखमी तर एक किरकोळ जखमी झालाय .पुणे जिल्ह्याच्या इंदापूर तालुक्यातील डाळज नंबर २ येथे राष्ट्रीय महामार्गावरती आज हा अपघात झाला. या अपघातात गाडीचा पुढच्या बाजूचा पूर्णतः चुराडा झालंय. पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर पुण्याकडून सोलापूरच्या दिशेने निघालेली (टी एस ०७ जी एल २५७४) ही गाडी डाळज हद्दीत आल्यानंतर अपघात झाला. या गाडीचा पुढील डाव्या बाजूचा टायर फुटल्याने साधारण ५० मीटर गाडी जमिनीला घासत येऊन कोसळली. गाडीने रस्त्यावर चार ते पाच पलट्या खात ड्रेनेज लाईनच्या सिमेंट खांबाला जोरात धडक दिली, त्यानंतर नाल्यात जाऊन पडली. गाडीत सहा पुरुष होते त्यापैकी ४ जण जागीच ठार झाले होते, तर एकजण



गंभीर जखमी झालाय तर एकजण किरकोळ जखमी झाला आहे. जखमीवर जवळील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. इरफान पटेल वय २४ वर्षे , मेहबूब कुरेशी ,वय २४ वर्षे , फिरोज कुरेशी, वय २६ वर्षे ,फिरोज कुरेशी वय २८ वर्षे हे सर्व जागीच मयत झाले आहेत. रफिक कुरेशी वय ३४ वर्षे हा गंभीर जखमी झाला असून सय्यद इस्माईल सय्यद अमीर ह्याला किरकोळ मार लागला आहे. अपघातातील सर्वजण तेलंगणा राज्यातील नारायणखेड , तालुका जिल्हा मेंढक येथील आहेत. अपघाताची माहिती समजताच डाळज महामार्गाचे पोलीस तात्काळ घटनास्थळी जाऊन अपघातातील जखमींना व ठार झालेल्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.

# पूजा भागवत यांना सौंदर्यवतीचा मुकूट

**पुणे । प्रतनिधी**

'मिसेस इंडिया एम्प्रेस ऑफ द नेशन'च्या पाचव्या सोहळ्यात एलिट विभागात पूजा भागवत यांनी सौंदर्यवतीचा मुकुट मिळविला. देशभरातील ५४ स्पर्धकांमध्ये त्यांनी सादरीकरण, वावर, प्रश्नोत्तरे अशा सर्वच विभागांत सरस कामगिरी केली.



दिवा पॅजंट्सच्यावतीने ही स्पर्धा नुकतीच झाली. या वेळी अभिनेत्री आणि माजी 'मिस इंडिया' इशा कोप्पीकर उपस्थित होत्या. सौंदर्य सोहळ्यातील सर्व बारकाव्यांचे प्रशिक्षण सहभागी सौंदर्यवतींना देण्यात आले. त्यात प्रश्नोत्तरे, रॅम्प वॉक, वैयक्तिक प्रशिक्षणाचाही समावेश होता. चार दिवसांच्या प्राथमिक फेरीतून अंतिम फेरीसाठी निवड झाली. हॉटेल हयातचे महाव्यवस्थापक संदीप सिंग, मीशा डायग्नोस्टिक्स अँड पॉलीक्लिनिकच्या डॉ. लीना गुप्ता, दिवा पॅजंट्सचे कार्ल मस्करेन्हास, दिवा क्वीन अपेक्षा डबराल, मिसेस एशिया पॅसिफिक स्पर्धेतील उपविजेती आरती गौतम यांचा परिक्षकांमध्ये समावेश होता. नृत्यदिग्दर्शक पूजा सिंग यांनी सहकार्य केले.

स्पर्धेतील विजेते : एलिट विभाग : विजेती : पूजा भागवत, पहिली उपविजेती : सुषमा शर्मा, दुसऱ्या उपविजेत्या : शैलजा मधोक.गोल्डन विभाग : विजेती : मनीषा आनंद, प्रथम उपविजेत्या : सई खलाटे, दुसऱ्या उपविजेत्या : अनिता माजू. सिल्व्हर विभाग : विजेती : डिंपल डिसूझा, प्रथम उपविजेत्या : डॉ अनुश्री पांडे, दुसऱ्या उपविजेती : शिखा शर्मा.

# उद्यापासून मिळणार पुरवणी परीक्षेचे प्रवेशपत्र

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीच्या पुरवणी परीक्षेची प्रवेशपत्रे (हॉलतिकिट) गुरुवारपासून (ता. ४ ) "www.mahahsscboard.in' संकेतस्थळावर उपलब्ध होणार आहेत. सर्व माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालये यांनी प्रवेशपत्राची छायांकित प्रत काढून विद्यार्थ्यांनी द्यावी, अशी सूचना राज्य मंडळाने दिली आहे.

राज्य मंडळातर्फे जुलै-ऑगस्टमध्ये दहावी-बारावीची पुरवणी परीक्षा घेण्यात येत आहे. या परीक्षेसाठी सर्व विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेशपत्र उपलब्ध करून दिली जाणार आहेत. गुरुवारपासून शाळा/महाविद्यालयांच्या लॉगिनमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेशपत्रे उपलब्ध असतील, ती डाऊनलोड करून विद्यार्थ्यांना छायांकित प्रत देण्यात यावी. दरम्यान, काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा, असे राज्य मंडळाने स्पष्ट केले आहे.

प्रवेशपत्र ऑनलाइन पद्धतीने प्रिटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. या प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापकांचा/प्राचार्यांचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी. प्रवेशपत्रात विषय आणि माध्यम बदल असतील तर त्यांच्या दुरुस्त्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळात समक्ष जाऊन करून घ्याव्यात. प्रवेशपत्रावरील छायाचित्र, स्वाक्षरी, विद्यार्थ्याचे नाव या संदर्भातील दुरुस्त्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर करून त्यांची एक प्रत विभागीय मंडळाकडे त्वरित पाठवावी. विद्यार्थ्यांकडून प्रवेशपत्र गहाळ झाल्यास संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पुन्हा प्रिंट काढून त्यावर लाल शाईने द्वितीय प्रत असा शेरा देऊन विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र द्यावे. छायाचित्र सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्यांचे छायाचित्र चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी, अशी सूचना राज्य मंडळाचे प्रभारी सचिव शैलेंद्र पाटील यांनी दिली आहे.

# पुणेकरांची पाणीकपात तुर्तास टळली, धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून पुणे आणि परिसरात होणाऱ्या संतधार पावसामुळे (झींपिश ठरळप) धरणात पाणीसाठा वाढला. खडकवासला धरणात साडे चार टीएमसी इतका पाणीसाठा झाला आहे. या धरणातून पुणे शहर आणि ग्रामीण भागाला पाणीपुरवठा होतो. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण प्रकल्पात ४.३५ टिएमसी पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे गेल्या सहा दिवसांमध्ये पाऊण टीएमसी पाणी वाढले आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू असल्याने पाणीसाठ्यात वाढ झाल्यामुळे शहरातील पाणी कपातीचे संकट तुर्तास टळले आहे.



यंदा राज्यात मान्सून वेळीआधीच दाखल झाला असला तरी अद्याप समाधानकारक पाऊस झाला नव्हता. परिणामी मागील महिन्यात धरणांनी तळ गाठला होता. पण गेल्या एका आठवड्यापासून पुणे शहरात आणि जिल्ह्यात समाधानकारक पाऊस झाला आहे. यामुळे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण प्रकल्पात ४.३५ टिएमसी पाणीसाठा झाला आहे.

पुण्यातील चार धरणाक किती पाणीसाठा?

पुणे शहर आणि जिल्ह्याला चार धरणांनी पाणी पुरवठा होतो ज्यामध्ये खडकवासला, टेमघर, वरसगाव आणि पानशेत यांचा समावेश आहे. सध्या चारही धरणं मिळून एकूण ४.३५ टी एम सी पाणीसाठा उपलब्ध आहे. मात्र मागील वर्षी याच काळात ४ ही धरणक्षेत्रात ५.४२ टीएमसी इतका पाणीसाठा होता.

# पिंपळगाव-खडकीत आज दूध परिषद

**मंचर । प्रतिनिधी**

पिंपळगाव-खडकी (ता.आंबेगाव) येथे श्रीराम मंदिरासमोरील सभागृहात बुधवारी (ता.३) रोजी सकाळी नऊ वाजता दूध परिषद आयोजित करण्यात आली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यावेळी मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेला दूध उत्पादक शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे. असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्रभाकर बांगर यांनी केले आहे.

# बॅनर अंगावर घेतलेल्या तरुणाचा अपघाती मृत्यू

**पिंपरी । प्रतिनिधी**

पावसात अंगावर बॅनर घेऊन झोपलेल्या तरुणाला अज्ञात वाहनाने चिरडले. यामध्ये त्याचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (दि. १) सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास घडली. कपिल विलास अंकुरे (२१, रा. बोरी, परभणी) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे.

वरिष्ठ निरीक्षक विजय ढमाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिघी पोलीस ठाण्याच्या हद्दीत आळंदी बसस्टॉपजवळील मोकळ्या मैदानात खून झाला असल्याची माहिती एकाने पोलिस नियंत्रण कक्षाला दिली. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकार्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांना एका बॅनरखाली कपिल याचा मृतदेह आढळून आला. कपिल यांच्या डोक्यावरून चाक गेल्याने त्यांचा मृत्यू झाला होता. त्याच्या अंगावर कोणत्याही मारहाणीच्या खुना नव्हत्या. शवविच्छेदन अहवालात देखील डोक्यावरून चाक गेल्याने कपिल याचा मृत्यू झाल्याचे समोर आले. दरम्यान, कपिल याने अंगावर बॅनर घेतला असल्याने अज्ञात वाहन चालकाला ते दिसले नाहीत. त्यामुळे वाहनाचे चाक डोक्यावरून गेल्याने त्याचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. दिघी पोलिस तपास करीत आहेत.

# पोर्शे कार अपघात प्रकरणात अग्रवाल बाप-लेकाला जामीन; चालकाच्या अपहरणाचा केला होता प्रयत्न

**पुणे । प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघात प्रकरणात कारचालक अल्पवयीन मुलाचा गुन्हा स्वतःच्या अंगावर घेण्यासाठी दबाव आणत चालकाच्या अपहरणाचा प्रयत्न केल्याप्रकरणात, बांधकाम व्यावसायिक विशाल सुरेंद्रकुमार अग्रवाल आणि सुरेंद्रकुमार अग्रवाल यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

चालक गंगाधर शिवराज हेरीक्रुब (वय ४२) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. अल्पवयीन मुलाचा गुन्हा स्वतःच्या अंगावर घेण्यासाठी चालकाच्या अपहरणाचा प्रयत्न करून त्याचा मोबाईल फोन काढून धमकावल्याप्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या सुरेंद्रकुमार ब्रह्मदत्ता अग्रवाल (वय ७७) आणि विशाल



सुरेंद्रकुमार अग्रवाल (वय ५०, दोघे रा. बंगला क्रमांक एक, ब्रह्मा सनसिटी, वडगाव शेरी) यांनी जामिनासाठी अर्ज केला होता. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एन. एस. बारी यांच्या न्यायालयात हा अर्ज करण्यात आला होता. तक्रारदार चालक हा पोर्शे कार अपघात प्रकरणातील महत्त्वाचा साक्षीदार आहे. आरोपी बापलेकांनी चालकाला धमकावून बंगल्यात डांबून ठेवत अल्पवयीन मुलाचा गुन्हा अंगावर घेण्यासाठी दबाव टाकला होता. तक्रारदाराचे कपडे आरोपींच्या बंगल्याच्या खोलीतून जप्त करण्यात आले आहेत. या घटनेच्या सीसीटीव्ही चित्रीकरणात आरोपींनी छेडछाड केली असून, आरोपींना जामीन झाल्यास ते पुन्हा पुराव्यात छेडछाड करू शकतात. अल्पवयीन मुलाला वाचविण्यासाठी आरोपींनी त्याच्या रक्ताच्या नमुन्यात फेरफार करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. आरोपींना जामीन झाल्यास ते पुन्हा तपासात अडथळे आणू शकतात, असा युक्तिवाद करत सरकार पक्षातर्फे जामिनास विरोध करण्यात आला होता.

# शिक्रापूरात बर्निंग कारचा थरार

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

पुणे-नगर महामार्गावरील शिक्रापूर येथे वर्दळीच्या अशा पाबळ चौकामध्ये एक कार अचानक पेटल्याचा प्रकार घडल्याने येथे बर्निंग कारचा थरार पाहण्यास मिळाला. या घटनेत कुठलीही जीवितहानी झाली नसून कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ओव्हर हीटिंगमुळे ही कार पेटल्याचा अंदाज आहे.

मंगळवारी सकाळी ११च्या सुमारास शिक्रापूर येथील व्यापाराचे मुख्य ठिकाण असलेल्या पाबळ चौक येथे ही घटना घडली. एमएच १४ जीयु २५१७ या कारने



अचानक पेट घेतल्याने एकच गोंधळ उडाला होता. वाहतूक पोलीस मिलिंद देवरे व ज्ञानेश्वर गोरे यांच्या सतर्कतेमुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. ही घटना झाल्यावर पाण्याचा टँकर बोलवून गाडीवरील आज नियंत्रणात आणण्यात आली. पाण्याच्या टँकरसाठी संतोष शेंडे सुधीर रुके यांनी मदत केली. यावेळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.

# झिका रुग्णांच्या एक कि. मी. परिसरात फवारणी

**पुणे । प्रतिनिधी**

शहरामध्ये झिका या संसर्गजन्य रोगाची लागण झालेल्या रुग्णांची संख्या सहावर पोहोचली आहे. यामध्ये दोन गर्भवती महिलांचा समावेश आहे. सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर आहे. झिकाचा संसर्ग वाढू नये, यासाठी रुग्ण आढळलेल्या घराच्या एक किलोमीटर परिसरातील घरांमध्ये धूर फवारणी करण्यात येत आहे, अशी माहिती महापालिकेच्या आरोग्य प्रमुख डॉ. कल्पना बळीवंत यांनी दिली. दरम्यान, नागरिकांनी योग्य काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.




शहरात एरंडवणा आणि मुंढवा परिसरात झिकाची लागण झालेले सहा रुग्ण आढळले आहेत. एरंडवणा परिसरातील बाप लेकीला झिकाची लागण झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर या परिसरातील १२ नागरिकांचे ब्लड सैंपल प्रयोगशाळेत पाठविले होते. त्याचे रिपोर्ट आले असून यामध्ये दोन गरोदर महिलांनाही झिकाची लागण झाल्याचे समोर आले आहे. तर मुंढवा येथे महिन्याभरापुर्वी एका महिलेला

झिकाची लागण झाली होती. ही महिला उपचार घेत असलेल्या खासगी रुग्णालयाने ही बाब विलंबाने महापालिकेला कळविली. त्या ठिकाणी आणखी एक रुग्ण आढळला आहे. डॉ. बळीवंत म्हणाल्या, सर्व उमेदवारांची प्रकृती स्थिर आहे. सर्वांना सौम्य लक्षणे आहेत. डेंग्यूचा आजार पसरविणारे एडीस एजिप्टी डासांपासूनच झिकाचा फैलाव होतो. स्वच्छ पाण्यात पैदास होणाऱ्या एडीस एजिप्टी डासांच्या प्रजननासाठी पावसाळी वातावरण पूरक आहे. परंतु प्राथमिक खबरदारी म्हणून रुग्ण आढळलेल्या परिसरातील एक कि.मी. परिघातील घरांमध्ये धूर फवारणी करण्यात येत आहे. एनआयव्हीच्या केंद्रीय अधिकाऱ्यांनीही आज झिकाबाबत महापालिकेच्या डॉक्टरांना मार्गदर्शन केले असून नागरिकांनीही योग्य ती काळजी घ्यावी, असेही डॉ. बळीवंत म्हणाल्या

# कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते कौशल्य विकास दिंडीचा शुभारंभ

## 'कुशल महाराष्ट्र - रोजगार युक्त महाराष्ट्र' चा संकल्प करूया- मंगलप्रभात लोढा

**पुणे । प्रतिनिधी**

आषाढी वारी सोहळ्याचे औचित्य साधून कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या कौशल्य विकास दिंडीत नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन 'कुशल महाराष्ट्र - रोजगार युक्त महाराष्ट्र' चा संकल्प करावा, असे आवाहन कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.

वानवडी येथे कौशल्य विकास दिंडीचा शुभारंभ मंत्री श्री. लोढा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या आयुक्त निधी चौधरी, संचालक दिगंबर दळवी, उपआयुक्त अनुपमा पवार, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू अपूर्वा पालकर आदी यावेळी उपस्थित होते.




मंत्री श्री. लोढा म्हणाले, कौशल्य विकास व उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या विविध योजना, कौशल्याबाबतचे ज्ञान व उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहचावी यादृष्टीने कौशल्य विकास दिंडीचे आयोजन केले आहे. या दिंडीत औद्यगीक प्रशिक्षण संस्थेचे ५ हजार विद्यार्थी, अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला आहे. कौशल्य विकासात राज्य अग्रेसर रहावे, युवकांनी कौशल्य आत्मसात करावे, त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्यातील ग्रामपंचायत स्तरावर टप्प्याटप्प्याने कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यात येतील. या केंद्रांच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. कौशल्य विकास विभागामार्फत विविध योजना, उपक्रम राबविले जातात याची माहिती वारीतील वारकऱ्यांना, नागरिकांना व्हावी,हादेखील या दिंडीच्या आयोजनामागचा उद्देश असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी मंत्री श्री. लोढा यांनी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे दर्शन घेऊन भैरोबा नाला येथे वारकऱ्यांच्या दिंडीत सहभागी होऊन टाळांच्या साथीने विठूनामाचा गजर केला आणि दिंडीत काही अंतर पायी वारी केली. कौशल्य विकास दिंडीचे आषाढी वारी सोबत भैरोबा नाला ते गाडीतळपर्यंत आयोजन करण्यात आले. यामध्ये पुणे शहरातील व जिल्ह्यातील शासकीय, अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पूर्व व्यावसायिक संस्था, किमान कौशल्य आधारीत संस्था, द्विलक्षी अभ्यासक्रम संस्था, प्रमाणपत्र अभ्यासक्रम संस्था आणि कौशल्य विकास विद्यापीठ तसेच रोजगार स्वयंरोजगार विभागाचे विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, स्टार्ट अप उपक्रमाचे लाभार्थी, ग्रामीण कौशल्य विकास केंद्रातील, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

# आषाढीवारीत 'संवादवारी'; लोककल्याणकारी योजनांच्या जागरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे । प्रतिनिधी**

आषाढी वारीत राज्य शासनाने घेतलेल्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांनी होण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे 'संवादवारी' या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून आज (दि. २) कदम वाकवस्ती आणि सासवड येथेआयोजित या उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे.

या उपक्रमात गुणवत्तापूर्वक महाराष्ट्राच्या मातृभाषेचे जतन आणि संवर्धनाच्या अनुषंगाने राज्य शासनाचे सुरू असलेले प्रयत्न, शिक्षण उज्वल भविष्याचे संवर्धन, आदर्श आश्रम शाळा आदी शिक्षण विषयक योजना, आरोग्य विभागाच्या विविध उपचारपद्धती, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, महात्मा फुले जन आरोग्य योजना, निरोगी आरोग्य तरुणाईचे वैभव महाराष्ट्राचे अभियान आदी आरोग्यविषयक योजना वारकऱ्यांपर्यंत पोहोचत आहेत.



महिलांसाठी सुरू केलेली महिला सन्मान योजना, आई महिला पर्यटन धोरण, माता तसेच बालकांसाठीच्या प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना, माता सुरक्षित तर घर सुरक्षित, जागरूक पालक सदृढ बालक अभियान आदी योजना, प्रधान मंत्री आवास-ग्रामीण, मोदी आवास योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अनुदान योजना, पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अमृत महाआवास अभियानाद्वारे सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या योजनांची माहिती देण्यात आहे.



आपत्ती व्यवस्थापन आणि बाधितांना मदत, भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना, जलयुक्त शिवार, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकरी भवन बांधणी, बाजार समित्यांना देण्यात येणारे अनुदान, ई-नाम, एक रुपयात पीक विमा योजना, नमो शेतकरी महासन्मान शेतकरी योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना, कृषी यांत्रिकीकरण योजना आदींची माहिती शेतकरी वारकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत आहे.

युवांसाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेअंतर्गत रोजगार मेळावे, मिशन लक्षवेध, सर्व घटकांसाठी सवलतीच्या दरात तीर्थस्थळांचे दर्शन घडवून आणणारी एसटीसंगे तीर्थाटन योजना, सामाजिक सुरक्षेच्या मुख्यमंत्री वयोश्री योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, तृतीयपंथीय धोरण २०२४ आदी योजना, राज्य पर्यटन पुरस्कार योजना, महाराष्ट्र राज्य मोतीबिंदू मुक्त अभियान, वस्त्रोद्योग विभागाची कॅप्टिव्ह मार्केट योजना आदी योजनांबाबत आकर्षक एलईडी चित्ररथ तसेच पथनाट्य व प्रदर्शनाद्वारे जनजागृती करण्यात येत आहेत.

दिलीप विश्वनाथ पाटील, अहमदपूर, जि. लातूर- आषाढीवारीच्या निमित्ताने राज्यशासनाच्यावतीने विविध योजनांची माहिती देण्यासाठी 'संवादवारी' उपक्रम आयोजित केला आहे. या प्रदर्शनात माहिती देण्यात आलेल्या योजनांचे लाभही आम्ही घेतले आहेत. जनतेसाठी या योजनांचा फायदा करुन घ्यावा.

आनंद शिंदे, ता. आंबेजोगाई, जि. बीड- संवादवारी उपक्रमाअतंर्गत सादर करण्यात येणारे पथनाट्य अतिशय उत्कृष्ट असून असे कार्यक्रम वारंवार सुरू ठेवावेत.